
# मेहता मराठी ग्रंथजगत


ऑक्टोबर, २०२३


पृष्ठे ६८ किंमत : रु. १५


वर्ष तेविसावे

अंक दहावा




“मी लेखनाला एक हस्तकला मानतो. मुलाला शिकवण्याची आपली सुरुवात म्हणजे अक्षरे लिहिण्याची बळजबरी आणि अशाने आपण त्या कलेचा जीव घेतो.”

## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**



### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

- १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.
- अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत
- पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो दिलेल्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ ऑक्टोबर २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक दहावा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

*– अनुक्रमणिका –*

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **प्रकाशन** | **८** |
| **पुरस्कार** | **१२** |
| **विक्रेत्यांच्या नजरेतून** | **१४** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| धर्म आणि समलैंगिकता | २० |
| झुंड | २८ |
| राफिणू | ३६ |
| क्युअर्ड | ४४ |
| **अभिप्राय** | **५६** |
| **दिनविशेष** | **६१** |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

## संपादकीय

# गांधीविचार-अक्षय्य विचारधन

भारताला स्वातंत्र्य मिळून ७६ वर्षे पूर्ण झाली. आपला देश पंच्याहत्तरी पूर्ण करून पुढे वाटचाल करतोय. स्वातंत्र्यपूर्व काळाचा विचार केला तर भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून अनेक लढे उभारले गेले, आंदोलने केली गेली. सर्व भारतीय स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्नशील होते.


लोकमान्य टिळक होते तोवर त्यांच्या नेतृत्वाखाली लोक एकत्र येऊन प्रतिकार करत होते. टिळकांच्या पश्चात मोहनदास करमचंद गांधी हे नेतृत्व उजेडात आलेले आपल्याला पाहायला मिळते. टिळकांच्या जाण्याने निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी गांधींच्या रूपाने भरून आलेली दिसून आली. 'गांधीविचार' व 'गांधीवाद' यांचे गारूड तत्कालीन समाजजीवनावर चांगल्या प्रकारे ठसले. त्याचा परिपाक म्हणून असहकार आंदोलन, भारत छोडो, मिठाचा सत्याग्रह इ. आंदोलने छेडून इंग्रजांविरोधात आवाज उठवला गेला.

जनसामान्यांना भुरळ घालणारे असे नेतृत्व असेल तर जे ध्येय ठरवले असेल ते सहजसाध्य होते. राजकीय, सामाजिक कुठल्याही प्रकारे लढा जेव्हा उभारला जातो त्यावेळस त्या लढ्याच्या अग्रभागी असलेला नेता आणि त्याची कार्यशैली या दोहोंचा एकत्रित असा प्रभाव लढ्यात सहभागी झालेल्या आंदोलनकर्त्या कार्यकर्त्यांवर असलेला पाहायला मिळतो. गांधींच्या बाबतही असंच काहीसं आहे. सल्ल्याचा आग्रह, स्वदेशीसाठीची चळवळ, अहिंसात्मक मार्गाने ईप्सित, ध्येय साध्य करून घेण्याचा आग्रह या गोष्टींचा मोठा प्रभाव तत्कालीन कार्यकर्त्यांवर झालेला दिसून येतो.



१९४२ साली पुकारले गेलेले असहकार आंदोलन हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वाचे असे पान. या घटनेनंतरच तीव्र असा लढा छेडला गेला आणि त्या आंदोलनात इंग्रजांच्या बेबंदशाहीला व जुलमाला असहकाराच्या रूपाने विरोध केला जाऊ लागला. गांधींच्या नेतृत्वात देशातील सामान्य नागरिक यात सहभागी झालेला दिसून आला. पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, लालबहादूर शास्त्री, लाला लजपतराय यांच्यासारखे देशपातळीवरील नेते, तसेच स्थानिक पातळीवरील नेते व कार्यकर्ते यांची एकजूट झालेली दिसून आली. याचा एकत्रित असा परिणाम म्हणजेच इंग्रजांना या आंदोलनकर्त्यांच्या मागणीवर गांभीर्याने विचार करणे भाग पडले.

१५ ऑगस्ट, १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. या घटनेसाठी सहनशील अशा भारतीय मनाचा त्याग आणि सत्याग्रह याचा मोठा असा वाटा असलेला दिसून येईल. हे सर्व घडून यावे, यासाठी खमक्या अशा नेतृत्वाची गरज असते, ती महात्मा गांधींच्या रूपाने पूर्ण झाली. गांधीजींनी प्रसार केलेला विचार म्हणजेच 'गांधीविचार' म्हणजेच 'गांधीवाद', हा विचार सहजासहजी पचेल वा रुचेल असा मुळीच नाही. 'गांधीविचार' हा आचरणात आणण्यासही व शिकवण्यासही अवघड अशा प्रकारातील विचार म्हणून गांधीविचाराचे गारूड यामुळे काही कमी झालेले आपणाला पाहायला मिळत नाही. पर्यायाने, आज नवीन पिढीतील जिज्ञासू असा युवावर्ग या विचाराकडे आकर्षिला गेलेला पाहायला मिळतो आहे. यातून 'मजबुरी का नाम गांधी' हे वारंवार अधोरेखित होताना दिसून येतं.



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

**Find us on: facebook**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!


आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazon kindle | Get it on Apple Books | Google Play Books

प्र

का

श

न


## हा हिंसेचा इतिहास आहे

ज्याने हजारो ज्यू कैद्यांच्या नजरेतला मृत्यू कॅमेऱ्यात बंद करून ऑशविट्झचं भयाण सत्य जगासमोर आणलं, त्या फोटोवाल्याची अस्वस्थ करणारी कहाणी सांगणारं हे पुस्तक 'ऑशविट्झचा फोटोवाला' आणि जगातल्या सर्वांत मोठ्या क्रौर्याच्या साक्षीदार ठरलेल्या दोन चिमुरड्या; ज्यांनी सत्तरीच्या उतरत्या वयात आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली, अशा 'ऑशविट्झच्या लहानग्या पोरी.' या दोन पुस्तकांचा मराठी अनुवाद 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित झालाय. या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा १४ सप्टेंबर, २०२३ रोजी मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे येथे पार पडला. या वेळी पुस्तकांविषयी संवाद साधण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात इतिहास विषय शिकवणारे प्राध्यापक देवकुमार अहिरे आले होते. सोबतच 'ऑशविट्झचा फोटोवाला' या पुस्तकाच्या अनुवादक वर्षा वेलणकर आणि 'ऑशविट्झच्या लहानग्या पोरी' या पुस्तकाच्या अनुवादक रेश्मा कुलकर्णी-पाठारे यांनीही वाचकांशी संवाद साधला. यावेळी अखिल मेहता, साहिल मेहता व रूपा मेहता आदी उपस्थित होते.

'ऑशविट्झचा फोटोवाला' या पुस्तकाच्या अनुवादक वर्षा वेलणकर म्हणाल्या की, 'अशा गोष्टी आपण जरूर वाचायला हव्यात; कारण यातूनच आपल्याला त्या माणसांचं तत्कालीन जगणं समजतं.' तसेच 'ऑशविट्झच्या लहानग्या पोरी' या पुस्तकाच्या अनुवादक रेश्मा कुलकर्णी-पाठारे म्हणाल्या की, 'मृत्यू हा फार कॉमन झालेला आहे... अशा परिस्थितीतलं जगणं हे त्या मुलींच्या मनावर भयानक परिणाम करून जाणारं आहे.'



या दोन्ही पुस्तकांविषयी बोलताना देवकुमार आहिरे म्हणाले की, 'हा हिंसेचा इतिहास आहे... मला खरंतर हिंसेचा त्रास होतो; परंतु तरीही हिंसेचा इतिहास शिकवावा लागतो, तसेच 'माणसं एखाद्यासाठी जनावरं कधी बनतात? जेव्हा ती इतरांना आपल्यापासून वेगळी समजायला लागतात. अनेकदा आपल्याला इतिहास वाचताना त्यातील छळाची तीव्रता जाणवत नाही; परंतु या पुस्तकातील अनुभव त्यांचे स्वत:चे असल्यामुळे ते अनुभव वाचल्यानंतर आपल्याला या छळाची तीव्रता प्रकर्षाने जाणवते,' असेही ते पुढे म्हणाले.




'ऑशविट्झचा फोटोवाला' विषयी बोलताना फोटोग्राफर आणि त्याची सामाजिक जबाबदारी या मुद्द्यांविषयी बोलताना ते म्हणाले की, फोटोग्राफीच्या विद्यार्थ्यांनी हे पुस्तक जरूर अभ्यासावे; कारण फोटोग्राफी कशी करावी, इथपासून ते फोटोग्राफीविषयीचे अनेक बारकावे यात नमूद केलेले आहेत.

फॅसिझम आणि आधुनिकता याविषयी बोलताना ते म्हणाले, 'विज्ञानाचं नाझीफिकेशन झालेलं आपल्याला दिसून येतं. त्यामुळे विज्ञानाचा वापर विध्वंसासाठी केला गेला आहे. तंत्रज्ञानाचा वापर आपण कसा करणार आहोत? माणसाच्या हितासाठी की माणसाच्या नाशासाठी?'

समाजात असे अनेक लोक असतात की, जे थेट विरोध करत नाहीत; पण याचा अर्थ असा नाही, ते सत्तेला शरण जातात... ते हळूहळू आपला विरोध अनेक मार्गांनी दर्शवत असतात... विल्यम ब्रेस हा त्यातला एक, असेही ते म्हणाले.





'ऑशविट्झच्या लहानग्या पोरी' या पुस्तकाविषयी बोलताना ते म्हणाले, 'आपल्या वर्तमानाची अनेक पाळेमुळे ही आपल्या लहानपणात दडलेली असतात.' शिक्षणतज्ज्ञ वृ्ष्णावु्मारांचो उदाहरण देत ते म्हणाले, 'आपल्याकडे तरुणपणाविषयी खूप

लिहिले जाते तसे लहानपण अभ्यासले जात नाही... आपल्या मूळ स्थानाविषयी प्रत्येकाला ओढ असते. तिथून विस्थापित वा स्थलांतरित होणं कुणालाही आवडत नाही; परंतु हा इतिहास स्थलांतराचाही आहे...'

'आज जगभरात फॅसिझम डोकं वर काढत आहे. अशा पार्श्वभूमीवर ही पुस्तके महत्त्वाची ठरतात' तसेच हे युद्ध फक्त ज्यू विरुद्ध जर्मन असे नसून, हिटलरच्या विरुद्ध असलेल्या सर्वांचेच आहे. मग त्यात जर्मनही येतात. असेही ते म्हणाले.

## विद्यार्थ्यांनी चळवळीसोबतच शिक्षण आणि करिअरला प्राधान्य देण्याची गरज

एखाद्या आंतरराष्ट्रीय लेखकाने वाचकांची 'थेट भेट' घेऊन त्यांच्याशी हितगुज करणं, ही वाचकांसाठी पर्वणीच म्हणायला हवी. त्यात जर लेखक




अंधाऱ्या आयुष्याशी झटून ॲकॅडमिक क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करून हार्वर्ड विद्यापीठापर्यंत पोहोचणारे डॉ. सूरज मिलिंद एंगडे असतील तर हा एक दुग्ध-शर्करा योगच म्हणायला हवा. 'कास्ट मॅटर्स' या त्यांच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद २०२१मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित झालाय. अलीकडेच याची तिसरी आवृत्तीही आली आहे. या निमित्ताने लेखक स्वत: वाचकांची 'थेट भेट' घेण्यासाठी १७ सप्टेंबर, २०२३ रोजी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात आले होते. वाचकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत लेखकाशी मनसोक्त गप्पा मारल्या, वेगवेगळे प्रश्न विचारत लेखकाचे मत जाणून घेण्यात आले व मार्गदर्शन मिळवून विविध प्रश्न आणि विविध विषयांवर चर्चा या ठिकाणी पार पडली.

विद्यार्थी, करिअर आणि चळवळी या विषयांच्या प्रश्नांवर बोलताना डॉ. सूरज एंगडे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी चळवळीत सहभाग दर्शविला पाहिजे;

परंतु सोबतच त्यांनी शिक्षण, करिअर आणि आर्थिक स्थिती स्थिर करण्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. धार्मिक कार्यक्रमांतून देशहिताची कामे, श्रमदानाचे महत्त्व अधोरेखित करत कशी करता येतील याकडे आपण लक्ष द्यायला हवे, असेही त्यांनी सांगितले. सर्वांनी एकत्र येऊन देशहितासाठी विविध उपक्रम व कामे करणे गरजेचे आहे. सोबतच त्यांनी प्रबोधनकार ठाकरे व पेरियार यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांचे स्मरण करत त्यांना अभिवादन केले.

यावेळी वाचकांना लेखकाच्या स्वाक्षरीसहित हे पुस्तक मिळवण्याची संधी मिळाली. वाचक आणि प्रेक्षकवर्गाला या ‘थेट भेटी’ मध्ये लेखक डॉ. सूरज एंगडेंसोबत फोटो काढण्याचा मोह आवरला नाही.

◆

**नवी संहिता... नवा आशय...**

**ऑक्टोबर रेन्स**

**सेरदार ओस्कान**

अनुवाद

**मुग्धा गोखले**




खुसखुशीत छोट्या छोट्या गोष्टींतून मांडलेलं आयुष्याचं सहजसुंदर तत्त्वज्ञान

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


पु र स्का र

## द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, २०२३ पुरस्कार

ज्ञानदा नाईक लिखित 'सोन्याचं कडं आणि इतर गोष्टी' या मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रकाशित पुस्तकाला उत्कृष्ट निर्मितीसाठीचे दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले.

## ल.र.फाउंडेशन पुरस्कार

लातूर येथील ल.र.फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार २०२३ मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रकाशित, एकनाथ आव्हाड यांच्या 'खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा' या बालकथासंग्रहास नुकताच मिळाला आहे. या पुरस्काराचं स्वरूप रोख अडीच हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असं आहे. लातूर येथे साहित्यिक डॉ. नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रसिद्ध कवी प्रा.इंद्रजीत भालेराव यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला.



**नवी संहिता... नवा आशय...**

TBC 33 - Book No. 4

# आइस स्टेशन झेब्रा




## ॲलिस्टर मॅक्लीन

अनुवाद

**अनिल काळे**

रशिया-अमेरिका शीतयुद्धातील हेरगिरीवर आधारित उत्कंठावर्धक कहाणी

**किंमत : ५५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# रिले




## मार्क लेव्ही

अनुवाद

**प्रा. पुरुषोत्तम देशमुख**

ॲन्ड्र्यू शोधतोय स्वत:चा खुनी...जोडीला नृशंस हत्याकांडातून वाचलेल्या दत्तक मुलांची कहाणी... उत्कंठेची चरमसीमा गाठणारी थरारक कादंबरी.

**किंमत : ४२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

वितरकाच्या नजरेतून

## एक ‘मॅजेस्टिक’ वारसा ...

ते २०१२साल होतं, माझी नुकतीच बी.कॉम.ची परीक्षा झाली होती,एक मोठ्ठी सुट्टी समोर होती आणि काय करायचं ते माझं काही ठरलं नव्हतं. अशावेळी एका सकाळी बाबांनी अचानक सांगितलं की, ‘आशय, आता तुझी परीक्षा झालीय, सुट्टी लागली आहे तर आपल्या शिवाजी मंदिरच्या दुकानात जाऊन बसत जा.’ आमचं शिवाजी मंदिरचं दुकान म्हणजेच ‘मॅजेस्टिक ग्रंथदालन’ हे काही मला नवीन नव्हतं. तिथे काय किंवा ठाण्याच्या राम मारुती रोडवरील किंवा गिरगावातील दुकानात काय, मी अनेकदा फेरी मारली होती. आता ग्रंथ प्रकाशक आणि ग्रंथविक्रेत्या परिवारातच जन्म झाला असल्याने पुस्तकांचे जग मला अपरिचित नव्हते; पण तरीही बाबांनी जेव्हा सांगितले की, दुकानात जाऊन बसत जा, तेंव्हा मला प्रश्न पडला होता की, ‘मी तिथे बसून काय करू?’ साहजिकच मी तो बाबांना विचारला. त्यावर ते म्हणाले, ‘‘अरे, तू बसत तर जा, मग बघू या.’’ मग काय, दुसऱ्या दिवसापासून माझी स्वारी रोज सकाळी ब्रेकफास्ट करून शिवाजी मंदिरच्या ग्रंथदालनात जाऊ लागली. पहिले काही दिवस मी फक्त तिथलं कामकाज पाहत होतो, पुस्तकांच्या दुकानात येणारे वाचक न्याहाळत होतो, एखाद्या विशिष्ट पुस्तकाच्या शोधात आलेल्या वाचकाला ते पुस्तक मिळालं तर त्याच्या चेहऱ्यावरचा अवर्णनीय आनंद आणि नाही मिळालं तर टोकाची निराशा बघून मला गंमत वाटायची. मग हळूहळू मी अधिक बारकाईने ग्रंथविक्री व्यवहार पाहू लागलो आणि समजून घेऊ लागलो. कोणत्या प्रकारची पुस्तके जास्त विकली जातात, लोक कोणत्या लेखकांची पुस्तके शोधत येतात, वाचकांना आता नेमकं काय वाचायला आवडतं, अशा गोष्टी हळूहळू ध्यानात येऊ लागल्या. घराण्याच्या परंपरेतून चालत आलेला प्रभाव म्हणा किंवा पुस्तकांच्या



वातावरणात राहिल्याचा परिणाम म्हणा; पण पुस्तकांशी माझं नातं कधी जुळलं ते मलाही कळलं नाही.

'कोठावळे' हे आडनाव मला मिळालं ते त्याला लाभलेल्या वलयासह, हे वलय आहे ग्रंथप्रकाशन, ग्रंथविक्री आणि ग्रंथप्रसार या त्रिदळाचं. हे वलय कोठावळे या आडनावाला मिळवून दिलं ते माझे आजोबा आणि 'मॅजेस्टिक'चे संस्थापक केशवराव कोठावळे यांनी. मला त्यांना प्रत्यक्ष बघायचे भाग्य लाभले नाही. माझा जन्म १९९० सालचा आणि माझ्या आजोबांचे निधन झाले १९८३ साली; परंतु लहानपणापासून मी आजोबांच्या, त्यांनी उपसलेल्या कष्टाच्या, त्यांच्या कल्पकतेच्या, त्यांच्या उपक्रमशीलतेच्या आणि त्यांच्या साहित्यिक संवेदनशीलतेच्या गोष्टी ऐकत आलो आहे. गिरगावात ज्या फुटपाथवर उभे राहून आजोबांनी पुस्तके विकली ती जागा मला बाबांनी एकदा दाखवली होती. फुटपाथवर उभे राहून जुनी पुस्तके विकणाऱ्या एका मुलाला पुस्तकांचे दुकानच थाटावेसे वाटते काय आणि दुकान सुरू केल्यानंतर पुस्तके प्रकाशित करण्याची इच्छा होते काय, आणि मराठीतील एका अग्रगण्य प्रकाशन संस्थेचा उगम होतो काय... सारंच एखाद्या कादंबरीत शोभावं असं. 'शून्यातून विश्वनिर्मिती' या वाक्प्रचाराचे साक्षात उदाहरण म्हणजे माझे आजोबा 'केशवराव काठावळे'.

आज कोठावळ्यांच्या परंपरेचा वारसदार म्हणून मी जेव्हा 'मॅजेस्टिक'च्या प्रवासाकडे बघतो तेव्हा आश्चर्य, अभिमान आणि समाधान यांनी माझे मन भरून येते. लौकिकार्थाने शिक्षण झालेले नसतानाही माझ्या आजोबांनी पुस्तके विकताविकता ती प्रकाशित करण्याचा खटाटोप सुरू केला. त्यावरच न थांबता १९६४ साली त्यांनी ग्रंथप्रसाराला वाहिलेले 'ललित' मासिक सुरू केले; जे गेली ५८ वर्षे सातत्याने सुरू आहे. ललित वाङ्मय न छापता पुस्तक परिचय, समीक्षा, लेखकांच्या मुलाखती, चर्चा, परिसंवाद, प्रकाशन विश्वातील बातम्या याचाच समावेश असूनही आजही 'ललित'चा वाचकवर्ग टिकून आहे, यातच आजोबांची दूरदृष्टी दिसून येते. आजोबांच्या उपक्रमशीलतेचं आणखी एक ठसठशीत उदाहरण म्हणजे 'मॅजेस्टिक गप्पा'. १९७३ साली आमच्या पुण्यातल्या वास्तूच्या गच्चीत 'साहित्यिक गप्पा' म्हणून केशवरावांनी हा उपक्रम सुरू केला. त्यांच्या पश्चात माझ्या वडिलांनी 'मॅजेस्टिक गप्पा' म्हणून तो मुंबईत आणला आणि गेली ४९ वर्षं ( कोरोनामुळे २०२१ चा

अपवाद वगळता) या गप्पा सातत्याने सुरू आहेत.

आजोबांचे अचानक निधन झाल्याने मॅजेस्टिकच्या सगळ्या कारभाराची धुरा माझ्या वडिलांच्या-अशोकरावांच्या खांद्यावर आली. आजोबांच्या उद्योगात त्यांना त्यांच्या भावाची 'तुकारामशेठ'यांची साथ होती, आजोबांच्या निधनानंतर अण्णांनी (तुकाराम कोठावळे) बाबांनाही मदत केली; मात्र त्यांचेही १९८९ मध्ये निधन झाले.

त्यानंतर 'मॅजेस्टिक'चा सगळा भार माझ्या बाबांनी एकट्यानेच पेलला. त्याआधी त्यांना इच्छा असूनही मॅजेस्टिक प्रकाशन किंवा ललितच्या कामात थेट सहभागी होता आले नव्हते. मात्र 'गवयाचे  पोर...'च्या धर्तीवर बाबांनी आमच्या व्यवसायाला आवश्यक गुण उपजतच प्राप्त केले होते. त्यांच्या वडिलांनी गो. नी. दांडेकर, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, ह. मो. मराठे, अरुण साधू, वि. स.वाळिंबे, सुभाष भेंडे असे लेखक खास मॅजेस्टिकचे म्हणून जोडले होते, त्यांच्या पावलावर पाऊल टाकून माझ्या बाबांनी भारत सासणे, अनंत सामंत, अनिल अवचट, मिलिंद बोकील, मुकुंद टाकसाळे, शरद वर्दे, आनंद नाडकर्णी, गणेश मतकरी असे लेखक मॅजेस्टिकशी जोडले. आजोबांनी सुरू केलेले उपक्रम जराही खंड न पडता सुरू ठेवणे आणि त्यात आवश्यक ते बदल करून नव्या पिढीलाही ते आवडतील याची खबरदारी घेणे, ही गोष्ट माझ्या वडिलांनी कायम आचरणात आणलेली मी पाहिली आहे. त्यामुळेच ललितचा उद्देश आणि हेतू लक्षात घेऊन, त्यात कालानुरूप बदल करतानाही त्यांनी ललितचा दर्जा आणि गुणवत्ता कधीही कमी होऊ दिली नाही. म्हणून तर आजही चोखंदळ वाचकांपासून ते साहित्याच्या अभ्यासकांपर्यंत सगळ्यांना ललित हवा असतो. पुण्यात सुरू झालेल्या गप्पा मुंबईत आणताना त्यांनी 'मॅजेस्टिक गप्पा' म्हणून आणल्या आणि त्यात साहित्याबरोबरच समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, संगीत-नाट्य -सिनेमा, क्रीडा अशा अनेक विषयांचा समावेश केला. शिवाजी मंदिर येथील ग्रंथदालन आणि ठाण्यातील बुक डेपो यातून माझ्या बाबांनी आमच्या मूळ व्यवसायाचा विस्तार केला आणि त्या-त्या भागातील ग्रंथप्रेमींची मोठीच सोय करून दिली.

हे सगळं पाहत मी लहानाचा मोठा झालो आहे, त्यामुळे जेव्हा शिवाजी मंदिरच्या ग्रंथदालनात जायला मी सुरुवात केली तेव्हाच तिथे जाणं हे माझ्यासाठी 'ऑनफिल्ड ट्रेनिंग' सारखं आहे, हे मला माहिती होतं. ग्रंथ-

विक्रीच्या जगात प्रवेश झाल्यानंतर मग मी अधिक चौकसपणे आणि सजगतेने त्यातले बारकावे पाहू लागलो, त्यातून मला जे कळत होतं, वाटत होतं त्याबाबत बाबांशी बोलू लागलो. मला घरच्या व्यवसायात रस वाटू लागलेला पाहून बाबांना नक्की त्यांची युक्ती सफल झाल्याचे समाधान मिळाले असणार. ग्रॅज्युएशननंतर मी मार्केटिंगमध्ये एम. बी. ए.केले आणि अधिक उत्साहाने आमच्या व्यवसायात सामील झालो. मी नेमकी कोणती जबाबदारी घ्यावी, कशात लक्ष घालावं, असं जेंव्हा मी बाबांना विचारलं तेव्हा त्यांनी मला इतकंच सांगितलं की, 'मी जे केलं नाहीये ते तू करून बघ.' माझ्यासाठी हा इशारा पुरेसा होता. आजोबांच्या गिरगावातील दुकानाच्या विस्तारित आणि आधुनिक शाखा बाबांनी दादर, ठाणे येथे सुरू केल्या होत्या, आता त्यापुढचा विस्तार हा आधुनिक काळानुसारच असायला हवा होता. पूर्वी पुस्तकांची दुकाने सर्वत्र असायची, शिवाय गावागावांत पुस्तक प्रदर्शने भरायची; मात्र नव्या सहस्रकात हे सगळं मागे पडू लागलं होतं. त्यामुळे आता वाचक दुकानापर्यंत येणार नाही तर पुस्तकांनी वाचकांपर्यंत जायला हवं, हे माझ्या लक्षात आलं. त्यामुळे मी नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून, नव्या पद्धतीने व्यवसाय वाढवण्यासाठी प्रयत्न करायचे ठरवले. आता विक्री आणि प्रसिद्धी दोन्हीसाठी इंटरनेट आणि त्यावरील समाजमाध्यमे उपलब्ध होती. लोकांना ई-कॉमर्स वेबसाइटमुळे भाजीपासून ते कपड्यांपर्यंत अनेक गोष्टी विकत घ्यायची सवय लागली होती, त्याचाच फायदा घेऊन मी ऑनलाइन पुस्तकविक्री सुरू केली. 'majesticreaders.com' या वेबसाइटवरून महाराष्ट्रातील दूरदूरच्या वाचकांपर्यंत आमची ग्रंथविक्री सेवा विस्तारली आणि त्याचा अपेक्षित परिणाम दिसून आला.

२०१२मध्ये जेव्हा आम्ही 'मॅजेस्टिक रीडर्स 'ची सुरुवात केली तेव्हा ऑनलाइन खरेदीचे प्रमाण आत्ताइतके नव्हते. विशिष्ट प्रकारच्या वस्तू आणि ठरावीक क्षेत्रातले लोकच ऑनलाइन खरेदी करायचे. त्यात प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक वस्तू, कॉस्मेटिक्स आणि कपडे होते. २०१२ मध्ये 'अॅमेझॉन'ही भारतात आले नव्हते. अशा काळात आम्ही मराठी पुस्तके ऑनलाइन उपलब्ध करून दिली. साहजिकच आमच्या या उपक्रमाकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले. आम्ही तेव्हा तीनशेहून अधिक प्रकाशकांची मराठी पुस्तके ऑनलाइन विक्रीसाठी उपलब्ध केली आणि गावागावांतील वाचकांची मोठीच सोय झाली. ऑनलाइन


ग्रंथविक्रीमुळे ‘मॅजेस्टिक’ हे नाव माहिती तंत्रज्ञानाच्या महामार्गावर पोहोचले. कोविडसाथीत लॉकडाउनमध्ये सगळी वाहतूक ठप्प झालेली असताना लोकांना या सुविधेचा भरपूर उपयोग झाला आणि ‘मॅजेस्टिक रीडर्स’ वरून पुस्तक-विक्री सुरू राहिली. व्हॉट्स ॲप आणि फेसबुक या समाजमाध्यमांचा योग्य वापर करून आपण आपला व्यवसाय नक्कीच वृद्धिंगत करू शकतो, हा अनुभव मी घेतला. डिजिटल माध्यमांमधून मुद्रित पुस्तकांच्या जाहिराती अधिक प्रभावीपणे करता येतात, दृक्-श्राव्य माध्यमाचे फायदे घेऊन वाचकांना पुस्तकांचा नेमका परिचय करून देता येतो, पुस्तकांकडे आकर्षित करता येते याचा अनुभव मी घेतला आहे. आमच्या ‘मॅजेस्टिक गप्पां’साठीही मी या माध्यमांचा वापर केला. २०१९ पासून आम्ही ‘मॅजेस्टिक गप्पा’ फेसबुकवर लाईव्ह दाखवायला सुरुवात केली आणि त्याला जोरदार प्रतिसाद मिळाला. आता त्या गप्पा यूट्यूबवर असल्याने कायमस्वरूपी ठेवा तयार झाला आहे. माझ्या या सगळ्या नव्या प्रयोगांना, उपक्रमांना बाबांनी अगदी खुलेपणाने पाठिंबा दिला आणि त्यामुळे मला वेगळाच आत्मविश्वास आला. तंत्रज्ञानाने जग बदललं आहे, जीवनशैली बदलली आहे आणि त्याबरोबरच वाचकांची पसंती, अभिरुचीही बदललेली पाहायला मिळते. बाबांनी प्रकाशनाची सूत्रे घेतली तेव्हा ललित साहित्याला जास्त मागणी होती, आता कथा-कादंबऱ्यांच्या तुलनेनं माहितीपर, उपयुक्ततावादी पुस्तके वाचण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. तसेच वेगवेगळ्या भाषांमधील, विविध विषयांवरील अनुवादित पुस्तकांनाही जास्त मागणी आहे. त्याचप्रमाणे आता वाचकांना ई-बुक्स, ऑडियो बुक्स असे नवे पर्याय उपलब्ध झाले आहेत, त्याचा प्रकाशन व्यवसायावर, ग्रंथविक्री व्यवसायावर नक्कीच मोठा परिणाम होईल. त्यामुळे प्रकाशन व्यवसाय आणि ग्रंथविक्री व्यवसाय एका स्थित्यंतरातून जात आहे आणि अशा वेळी मी या व्यवसायात काम करत आहे. माझ्यामागे ‘मॅजेस्टिक’ नावाची ‘राजमुद्रा’ आहे आणि ‘कोठावळे’ नावाचे वलयही आहे. दोन पिढ्यांनी अतिशय कष्टाने, कल्पकतेने आणि प्रामाणिकपणे उभारलेल्या व्यवसायाची पालखी खांद्यावर घेताना जबाबदारीच्या जाणिवेचं थोडंसं दडपण जसं आहे त्याचप्रमाणे ही पालखी आपण नक्की वाहू शकतो याचा आत्मविश्वासही आहे.

**– आशय कोठावळे**

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# द्वेषापलीकडील लक्ष्मण



संपादन
**डॉ. यशवंत मनोहर**
**डॉ. रावसाहेब कसबे**

संपादन साहाय्य
**प्रा. भाईशैलेंद्र माने**
**कमलाकर नावकर**
**मच्छिंद्र जाधव**

लक्ष्मण माने यांच्या षष्ट्यब्दीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला लेखरूपी आढावा

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# प्रकाशपुत्र





**लक्ष्मण माने**

राजकारणाने केला बापूचा आणि त्याच्या कुटुंबाचा घात...'प्रकाशपुत्रा'ने मात्र दाखवली सुमाला वाट...ज्वलंत विषयावरचं ज्वलंत नाटक

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तकाच्या पानांतून




# धर्म आणि समलैंगिकता

**देवदत्त पट्टनायक**
अनुवाद
**सोनाली नवांगुळ**

*समलैंगिकते भोवतीचं अज्ञानाचं वलय दूर करत जगभरातील धर्मांचा देवदत्त पट्टनायक यांनी घेतलेला सांगोपांग आढावा*

## धर्म

### सनातन धर्म

**अंकित भूपतानी :** सनातन धर्म म्हणजे काय?

**देवदत्त पट्टनायक :** 'सनातन' या शब्दाचा अर्थ असा : ज्याची ना सुरुवात आहे, ना शेवट, जो अनादि आहे, अनंत आहे आणि ज्याला कसलीही सीमा नाही. विशेष प्रकारे अर्थ सांगायचा असल्यास, 'सनातन धर्म' संस्कृतीच्या अशा विचारधारेला म्हणतात, जिचा पुनर्जन्मावर विश्वास असतो. पुनर्जन्माची विचारधारा भारतापासून सुरू झाली. त्यामुळेच या तत्त्वांना आणि श्रद्धांना



'भारतीय धर्म' असंही म्हणता येईल.

अलीकडे आपण 'धर्म' या शब्दाला मजहब/धर्म/मत या अर्थाशी जोडून टाकलं आहे. मात्र धर्म या शब्दाचे वेगवेगळे अर्थ होतात. बुद्धांच्या मते, त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालणं म्हणजे धर्म. मात्र वेदशास्त्रांनुसार, जिचं आचरण मत्स्य न्यायाच्या विरोधात असतं अशी प्रत्येक व्यक्ती मानवधर्माचं पालन करते. यालाच आपण माणुसकी म्हणतो आणि आपल्या शास्त्रांनुसार माणुसकी ही संस्कृतीचा आधार आहे. मत्स्य न्यायाचा अर्थ जंगल राज. तिथं मोठा मासा लहान माशाला गिळतो.

अर्थात धर्माचं पालन करायचं म्हणजे व्यक्तिगत आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडायच्या. खाजगी आणि सामाजिक ऋण फेडून इंद्रियांवर विजय मिळवायचा आणि पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्त व्हायचं. यालाच मोक्षप्राप्तीदेखील म्हणतात.

प्रत्येक धर्म स्वत:ला सनातन मानतो. इस्लामच्या मते, जेव्हापासून अल्लाहने सृष्टी निर्माण केली, तेव्हापासून आजतागायत तो जीवन अनुसरण्याच्या नियमांचा त्याचा निरोप्या या नात्यानं आपल्या जगात पैगंबरांना/प्रेषितांना पाठवतो आहे. पैगंबरांच्या या मालिकेतील अंतिम पैगंबर म्हणजे मुहम्मद अशी इस्लामची श्रद्धा आहे.

विविध सनातन धर्म

**अंकित :** सनातन धर्म आणि हिंदू धर्म हे दोन्ही एकच आहेत, की वेगवेगळे आहेत?

**देवदत्त :** कर्म, पुनर्जन्म, आत्मा, मोक्ष आणि निर्वाण हे ज्या धर्मात असतं, त्या धर्मांना 'सनातन धर्म' म्हणतात. सनातन धर्माच्या वनात चार झाडं आहेत : हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख.

हिंदू धर्माच्या झाडाला अनेक शाखा फुटलेल्या आहेत, उदा. तंत्र, वेद, अगम, निगम, वैष्णव, शैव आणि शाक्त परंपरा.

बौद्ध धर्माच्या झाडालाही अनेक शाखा आहेत, श्रीलंका आणि दक्षिण पूर्व आशियामध्ये दिसणारा थेरवाद; जपान आणि पूर्व आशियातील काही देशांमध्ये आढळणारा महायान आणि तिबेटमध्ये असणारा वज्रयान.

जैन धर्मातील झाडाच्या मुख्य शाखा म्हणजे श्वेतांबर आणि दिगंबर

परंपरा. मूर्तिपूजक आणि स्थानकवासी-या परंपरांच्या काही उपपरंपराही आहेत.

काही लोक शीख धर्मालाही सनातन धर्म मानतात, कारण त्यात देवाला निराकार मानण्यात आलं आहे. शीख धर्माच्या काही मूळ परंपरा आहेत, त्या म्हणजे खालसा, नामधारी आणि निरंकारी.

सनातन धर्म, इस्लाम धर्म आणि ख्रिस्ती धर्म-फरक

**अंकित :** सनातन धर्म, इस्लाम धर्म आणि ख्रिस्ती धर्म यामधले फरक कोणते?

**देवदत्त :** ख्रिस्ती धर्म २००० वर्षं जुना, तर इस्लाम १४०० वर्षं जुना आहे. अरबी आणि फारसी देशांच्या मार्गे ८०० वर्षांपूर्वी इस्लाम भारतात आला आणि ख्रिस्ती धर्म युरोपात पोर्तुगालांच्या ५०० वर्षं आधी आला.

सनातन धर्माच्या अनुयायांची पुनर्जन्म, पुनर्मृत्यू आदींवर श्रद्धा असते, तर इस्लाम आणि ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांचा ‘केवळ एकदाच जन्म व एकदाच मृत्यू असतो’, यावर विश्वास असतो.

इस्लाम आणि ख्रिस्ती धर्म एकेश्वरवादी आहेत. इंग्रजीत देवाला गॉड, अरबी भाषेत त्याला अल्लाह, तर फारसी भाषेत खुदा म्हणतात.

इस्लाम आणि ख्रिस्ती धर्म पैगंबरांच्या परंपरेवर आधारलेला आहे. देवाचा निरोप माणसांपर्यंत पोहोचवणारी व्यक्ती म्हणजे पैगंबर किंवा प्रेषित. देवानं धाडलेल्या निरोपाचं पालन करणारी माणसं स्वर्गात जातात, आणि तो पाळत नाहीत अशी नरकात पोहोचतात, अशी धारणा.

इस्लाममध्ये मुहम्मदला अखेरचा प्रेषित मानतात, मात्र ख्रिस्ती धर्मात येशूला अंतिम प्रेषित मानलं गेलं आहे.

ख्रिस्ती धर्मानुसार येशूख्रिस्त केवळ पैगंबर नव्हते, तर ते देवाचे पुत्रही होते. काही माणसांची श्रद्धा अशी की, ते ईश्वराचं मानवी रूप आहे. म्हणूनच ख्रिस्ती धर्मात प्रेमाला सगळ्यांत जास्त महत्त्व दिलं जातं. तिथं प्रेम हाच देवाचा संदेश आहे. या ठिकाणी केवळ नियम, नीती, रीती अशा गोष्टीच असतात असं नाही, तिथं प्रेमावर जास्त बोललं जातं.

मात्र दोन्ही धर्मांमध्ये एका मुद्द्याबाबतीत एकवाक्यता आहे, की तुम्ही

एकदाच जन्म घेता. त्या जन्मात तुम्ही कसं जगता, त्यावर एक रिपोर्ट कार्ड तयार होतं आणि त्याआधारे ठरतं की, तुम्ही स्वर्गात जाणार की नरकात. सनातन धर्मात जसा पुनर्जन्माचा विचार असतो त्याउलट इथं घडतं, पुनर्जन्माविषयीची चर्चा इथं घडत नाही. उपनिषदांमध्ये वापरल्या गेलेल्या परमात्मा आणि जीवात्मासारख्या शब्दांचा ख्रिस्ती आणि इस्लाममध्ये कुठेही उल्लेख नाही.

त्यामुळेच तुम्ही असंही म्हणू शकता, की या दोन निराळ्या परंपरा आहेत -

एक, सनातन धर्म म्हणजेच दिगंबर परंपरा-जिच्यात त्यागाद्वारे पुनर्जन्मापासून मुक्ती मिळते आणि दुसरी नियम पालनातून स्वर्गप्राप्तीचा मार्ग देणारा ख्रिस्ती आणि इस्लाम धर्म, अर्थात पैगंबर परंपरा!

## लिंग आणि लैंगिकता

**अंकित :** इंग्रजीत सेक्स, सेक्शुॲलिटी आणि जेंडरसारखे शब्द आहेत. ते आपल्या भाषेत कसे समजून घ्यायचे?

**देवदत्त :** आता 'लैंगिक शास्त्र' अर्थात 'जेंडर स्टडीज'सारख्या विषयांच्या माध्यमातून आपलं ज्ञान वाढतं आहे. म्हणूनच नवे शब्दही उगवताहेत.

१५०० वर्षांपूर्वी भारतीय शास्त्रांमध्येही या विषयांची चर्चा झाली होती. मात्र त्या वेळी ती चर्चा पुढे वाढली नाही, त्यामुळे आपण हे ज्ञान विसरून गेलो. त्याचं एक कारण असंही असू शकतं की, आपल्या गुरूंना कामशास्त्रापेक्षा मोक्षशास्त्रात रुची होती. उदाहरणार्थ, जैन मुनींनी भौतिक शरीर आणि भाव शरीर अर्थात शरीराचं लिंग आणि मनाचं लिंग यांच्यामधील फरक समजून घेतला. पण हा विचार शास्त्रापुरता मर्यादित राहिला आणि सामाजिक पातळीवरील शब्दकोशात त्याला मान्यता मिळाली नाही.

विज्ञानाबाबतीत तुम्ही जेवढं शोधाल, तेवढ्या गोष्टी तुम्हाला शिकायला मिळतात आणि नवीन शास्त्रं उदयास येतात. अलीकडे लैंगिक शास्त्राबाबतीत खूप चर्चा घडू लागली आहे, कारण या शास्त्राच्या माध्यमातून आपल्याला खूप शिकायला मिळतं आहे आणि या ज्ञानाचा राजकारण, अधिकार-वाद

आणि सामाजिक न्यायावरही परिणाम होत आहे.

जीवशास्त्र शरीरावर लक्ष केंद्रित करतं, तर मानसशास्त्र मनावर एकाग्र होतं. जे लिंग डोळ्यांना दिसतं, अर्थात शरीराचं लिंग, त्याला इंग्रजीत ‘सेक्स’ असं म्हणतात. सेक्सचा दुसरा अर्थ लैंगिकसंबंध. बहुतांशी माणसं शरीर आणि मनाचा लिंगभेद पाळत नाहीत. समाजात काही पुरुष असे असतात, जे स्वत:ला पुरुष नव्हे, तर स्त्री समजतात आणि स्त्रीरूपातच स्वत:ला व्यक्त करतात किंवा काही स्त्रिया स्वत:ला स्त्री नव्हे, तर पुरुष समजतात आणि पुरुषरूपात त्या व्यक्त होतात. हिंदू धर्मशास्त्रानुसार अशा लोकांना ‘नपुंसक’ म्हणतात. भारतात नपुंसकांचा (षंढ) उल्लेख २३०० वर्षं जुन्या ग्रंथात, पतंजली महाभाष्यात आढळतो.

मात्र ही गोष्ट इतकी सरळसोट नाही. पुरुष केवळ स्त्रियांकडे आकर्षित होतात आणि स्त्रिया केवळ पुरुषांकडे आकर्षित होतात, अशी समाजाची धारणा आहे. खरं तर धारणेपेक्षा लोकांचा हा निव्वळ गैरसमजच आहे. कारण निसर्गात असं घडत नसतं. निसर्गात काही पुरुष पुरुषांकडे आकर्षित होतात आणि काही स्त्रियांना स्त्रियांचं आकर्षण असतं. हे असं कधी प्रेमभावनेतून घडतं, कधी लैंगिक भावनेतून, तर कधी लैंगिक इच्छापूर्तीच्या अभिलाषेपोटी. मात्र यापैकी नेमकं काय घडतंय याकडं आपण विशेष लक्ष देत नाही, कारण लहानपणापासून शाळेत याविषयी शिकवलेलं नसतं.

मात्र शास्त्रज्ञांनी यावर सखोल अभ्यास केला आहे आणि त्यातून त्यांनी असं म्हटलंय की, आपण जेव्हा ‘जेंडर’ हा शब्द वापरतो, तेव्हा त्यामध्ये वास्तवात तीन शब्द असतात-सेक्स, जेंडर आणि सेक्शुॲलिटी.

उलगडून सांगायचं तर -

१. शरीराचं लिंग किंवा द्रव्य (भौतिक) शरीर = सेक्स (सेक्सचा दुसरा अर्थ होतो लैंगिकसंबंध)
२. मनाचं शरीर किंवा भाव शरीर = सेक्शुॲलिटी
३. समाजाचं शरीर किंवा व्यक्त शरीर = जेंडर

## द्रव्य (भौतिक/जड) शरीर

‘सेक्स’चा अर्थ तुमचं शरीर कसं आहे? म्हणजे पुल्लिग असणारं की स्त्रीलिंग असणारं? काही माणसांबाबतीत ते स्त्री आहेत, की पुरुष

हे त्यांच्या बाह्य रूपावरून कळत नाही. त्यांच्या जन्मा वेळी त्यांच्या लिंगाकडं बघून मुलगा आहे, की मुलगी हे डॉक्टरांना सांगता येत नाही. अशा मुलांना 'आंतरलिंगी' म्हणतात. अशी मुलं-मुली वयानं मोठी होतात, तेव्हा त्यांना कुठल्या लिंगाविषयी आकर्षण वाटतंय, ते त्यांना सांगता येत नाही. अशा वाटण्याला, धारणेला आपण 'भावशरीर' म्हणतो.

काही माणसं शरीराच्या लिंगाचा स्वीकार करतात, काही करत नाहीत. काही माणसांचं शारीरिक लिंग पुरुषाचं असतं, पण ते त्याचा स्वीकार करत नाहीत. काही माणसांबाबतीत ते स्त्रीचं असतं, पण ते स्वत:ला स्त्री मानत नाहीत. ते डॉक्टरांकडून शस्त्रक्रिया करवून घेऊन स्वत:चं शारीरिक लिंग बदलून टाकतात. अशा माणसांना 'ट्रान्सजेंडर' म्हणतात.

**भावशरीर-**

'सेक्शुॲलिटी'चा अर्थ, तुम्ही कुणाकडे आकर्षित होता... आणि हे आकर्षण समलिंगी आहे, की विषमलिंगी, की दोन्ही प्रकारचं आहे! या वाटण्याला 'सेक्शुॲलिटी' किंवा 'लैंगिकता' म्हणतात. काही पुरुष केवळ पुरुषांकडे किंवा पुरुष आणि स्त्रिया दोन्हींकडे आकर्षित होतात आणि काही स्त्रिया केवळ स्त्रियांकडे किंवा स्त्री आणि पुरुष दोहोंकडे आकर्षित होतात.

प्राचीन काळात समलिंगी पुरुष आणि स्त्रियांना किंवा लिंग बदल करून घेणाऱ्या माणसांना 'नपुंसक' म्हटलं जात असे. अलीकडे या दोन्ही अवस्थांबाबतीत एकच शब्द वापरायचा असेल, तर त्याला इंग्रजीत 'क्वीअर' असं म्हणतात.

**व्यक्त शरीर-**

समाजात वावरताना आपण आपल्या कपड्यांद्वारे आणि व्यवहारातून/वर्तणुकीतून स्वत:ला व्यक्त करत असतो. पुरुषांना पुरुषांचे कपडे घालावे लागतात आणि पुरुषानं जसं वागणं अपेक्षित आहे, तसं वागावं लागतं. तसं घडलं नाही, तर लोक टिंगल करतात. याच प्रकारे स्त्रीला तिला शोभेसे कपडे घालावे लागतात आणि स्त्रीसारखं आचरण करावं लागतं, अन्यथा लोक कुचेष्टा करतात. यालाच आपण व्यक्त शरीर किंवा जेंडर म्हणतो. कोणत्याही 'नपुंसक' अथवा 'क्वीअर'साठी हे सोपं नाही. जे लिंग

आपण स्वीकारलेलं असतं आणि व्यक्त करत असतो, त्याबाबतीत अनेकदा दबाव असतात. अनेक माणसांबाबतीत हे अवघड असतं. आयुष्यभर या गोष्टीनं ते त्रासात असतात. कुणालाही काही सांगत नाहीत. लैंगिक शास्त्रातील अभ्यासकांना ही गोष्ट नैसर्गिक असल्याचं ठाऊक असतं. मात्र वर्षानुवर्षं रूढीपरंपरांच्या विळख्यात अडकल्यानं ही नैसर्गिकता स्वीकारण्यासाठी समाज संकोचतो, भितो. एके काळी स्त्रियांचं शिक्षण आणि नोकरीबाबतीतही जशी आडकाठी असायची तसंच हे!

काही पुरुषांना आपण पुरुष आहोत, असं वाटत नाही. त्यांना स्वत:ला स्त्रीरूपात अभिव्यक्त व्हायचं असतं, पण ते मोकळेपणानं तसं करू शकत नाहीत. ही इच्छा ते सगळ्यांपासून लपवतात. ते स्वत:ला पुरुष म्हणूनच व्यक्त होऊ देतात. त्यापैकी मोजकेच आपल्या भावना व्यक्त करतात.

- आणि मग असे लोक स्त्रीरूप धारण करतात. बहुतांशी शास्त्रज्ञांचा अंदाज आहे की, जगभरातील १०% लोकसंख्येची अशी भिन्न मतं आहेत. याचाच अर्थ प्रत्येक दहाव्या व्यक्तीचे असे वेगळे विचार असणार आहेत. काही तज्ज्ञांचं विचारभिन्नतेबाबतीतील मत ८०% लोकांबाबतीत आहे, हेही उल्लेखनीय म्हणावं असं.

ही केवळ अंदाजे आकडेवारी आहे. निश्चित आकडेवारी कोणालाच ठाऊक नाही. कारण या गोष्टींवर आपण उघडपणे चर्चा करत नाही. स्थूलमानानं सांगायचं तर असं सांगता येईल की, शास्त्रांमध्ये सांगितल्याप्रमाणे लिंगाचे तीन प्रकार पडतात-एक, पुरुष : ज्याला आपण सामान्यपणे पुरुष म्हणून गृहीत धरतो की, हा पुरुष आहे, तो स्त्रीकडे आकर्षित होणार आणि पुरुष म्हणून स्वत:ला व्यक्त करणार. दुसरं लिंग स्त्रीलिंग, त्याबाबतीत आपण म्हणतो की, ही स्त्रीसारखी दिसते आणि पुरुषांकडे आकर्षित होते आणि स्त्री म्हणून ती स्वत:ला व्यक्त करते.

'क्वीअर' माणसांना शास्त्रांमध्ये 'नपुंसक' म्हटलं गेलंय. असे पुरुष दिसताना पुरुषांसारखेच दिसतात; मात्र त्यांच्या भावना, त्यांना असलेलं आकर्षण हे स्त्रीविषयी नसून पुरुषाबद्दल असतं, किंवा मग स्त्री आणि पुरुष दोहोंबद्दल असतं. अशाच प्रकारे काही स्त्रियांबाबतीतही घडतं. काही स्त्रियांना केवळ स्त्रीबद्दलच आकर्षण असतं किंवा स्त्री-पुरुष दोहोंबद्दल असतं. अशा

तऱ्हेच्या सगळ्या माणसांना एका खोक्यात बसवून आम्ही एक नवा समूह तयार केला आहे, एक नवा वर्ण/वैशिष्ट्य घडवलं आहे आणि त्याचं नाव ठेवलं आहे, 'क्वीअर'.

अशा प्रकारे तीन समूह आहेत.

आजच्या काळात लोक LGBTIQ हा शब्दप्रयोग करतात. त्यातील घटक असे :

L = लेस्बियन = जी स्त्री शारीरिक आणि मानसिक पातळीवर स्वत:ला स्त्री समजते आणि स्त्रीकडे आकर्षित होते.

G = गे = जो पुरुष शारीरिक आणि मानसिक पातळीवर स्वत:ला पुरुष समजतो आणि पुरुषाकडे आकर्षित होतो.

B = बायसेक्शुअल = जे स्त्री-पुरुष अन्य स्त्री अथवा पुरुष दोहोंकडे आकर्षित होतात.

T = ट्रान्सजेंडर, ट्रान्ससेक्शुअल = जी व्यक्ती स्वत:चे लिंग बदलते.


I = इंटरसेक्स = ज्यांच्या शारीरिक लिंगावरून ते पुरुष आहेत अथवा स्त्री हे कळत नाही.

Q = क्वीअर = जे समाजाच्या लिंग आणि लैंगिकतेबद्दलच्या सीमा व धारणांना स्वीकारत नाहीत.

(लक्षात ठेवा, या शब्दांच्या सूक्ष्म अर्थसंबंधांत अभ्यासक/तज्ज्ञांमध्ये अनेक विवाद आहेत आणि म्हणूनच या शब्दांचे भावार्थ समजून घ्या, शब्दार्थ नव्हे.)

◆

पुस्तकाच्या पानांतून




# झुंड

## बाबाराव मुसळे

*सत्ताकारणाच्या क्रूर चक्रव्यूहाचा सामूहिक ताकदीनं सामना करण्याचं तंत्र शिकवणारी नवीकोरी कादंबरी*

"चलो, मालेगाववाले. पुराना स्टँड. उतरो पटापट. और बासमवाले रेडी रहो. पंधरा मिनट में गाडी बासम पहुचेंगी." ट्रॅव्हलच्या कंडक्टरनं घोषणा केली. 'बासम' म्हणजे 'वाशीम'. या नावाची गंमत आहे. त्याचं प्राचीन नाव 'वत्सगुल्म'. 'वत्स' नावाचा कोणी ऋषी इथं त्याच्या शिष्यांच्या गुल्मासह म्हणजे समूहासह राहत होता. म्हणून 'वत्सगुल्म'. दुसरी आख्यायिका अशी, की इथं 'वत्स' आणि 'गुल्म' नावाच्या दोन भावांचं राज्य होतं. म्हणून 'वत्सगुल्म'. ही म्हणे वाकाटकांच्या विशाल राज्याची राजधानी. पुढं वत्सगुल्मचा 'वच्छोम' असा अपभ्रंश होऊन त्याचं 'वाशीम' झालं. मुस्लीम आले. त्यांनी वाशीमचं 'बासम' केलं. १ जुलै १९९८ रोजी अकोला जिल्ह्यातून फुटून 'वाशीम' स्वतंत्र जिल्हा झाला. मात्र पुण्या-मुंबईकडच्या काही



लोकांना अजूनही 'वाशीम' माहीतच नाही. त्यांना 'वाशीम' म्हणजे मुंबईजवळची वाशी वाटते. एका क्षणात विशालच्या डोळ्यांसमोरून ह्या गोष्टी गेल्या. तो रात्रभर जागाच होता. खरं तर त्याला ट्रॅव्हलमध्ये झोपच लागत नाही. रात्रभर तळमळत पडून राहावं लागतं आणि तशीही दोन दिवसांपासून त्याची झोप उडाली होती. परवा सकाळीच विनोद बंडूमामाला अचानक शहा इस्टेटवर घेऊन आला होता. विनोद विशालचा सख्खा मामेभाऊ. मोठ्या दिलीपमामाचा मुलगा. दोन वर्षांपासून तो पुण्यात एका सरकारी ऑफिसमध्ये क्लार्क म्हणून लागला. कानामागून आला अन् शहाणा झाला. तसा विशालचा घरच्यांशी संबंध उरला नव्हता. तो वाशीमला बी. ए. सेकंड इअरला शिकत असतानाच त्याच्या बाबानं –देविदासनं त्याला पैसे देणं बंद केलं होतं. त्यानं स्वतःच्या हिमतीवर बी. ए. थर्ड इअर पूर्ण केलं. 'कमवा अन् शिका' या तत्त्वाचा वापर करून त्यानं ते वर्ष काढलं. त्याकामी इकॉनॉमिक्सच्या दंडेसरांचं मोलाचं सहकार्य त्याला लाभलं. त्या अनुभवावरूनच त्यानं बी. ए. झाल्यावर एम. पी. एस. सी.च्या अभ्यासासाठी सरळ पुणं गाठलं. देविदास तरी काय करणार? विशाल बी. ए. थर्ड इअरला गेला त्याच वर्षी तो कृषी उत्पन्न बाजार समितीतून शिपाईपदावरून रिटायर्ड झाला. त्याला पेन्शनचे चार लाख त्रेपन्न हजार रुपये मिळाले होते. त्या पैशांच्या भरोशावर देविदासनं मालूच्या लग्नासाठी घेतलेलं सावकारी कर्ज आधी फेडलं. काढले होते एक लाख. त्याचे तीन वर्षांत झाले तीन लाख सतरा हजार. ते ऐकून देविदास हादरला होता. व्याजाचा हा कोणता दर होता? पण बोलायची सोय नव्हती. कारण ज्या माणसाकडून त्यानं पैसे घेतले होते तो शहरातला सबसे बडा श्रीमंत अन् डॉन माणूस होता. देविदास त्याच्या कचाट्यात सापडला कसा, हाच एक प्रश्न होता. तरी देविदास त्याला त्याचे सर्व पैसे देऊन आला... अन् देविदासला त्याच रात्री पॅरालिसिसचा अटॅक आला. घरच्यांनी पटकन् दवाखान्यात नेलं. डॉक्टरांनी तात्पुरता इलाज केला. 'अकोल्याला न्या' म्हणाले. तीन हप्ते तिथं ठेवावं लागलं; बरा झाला. पण दवाखान्याच्या बिलापायी ९६ हजार रुपये गेले. पेन्शन अशीच गेली. बाकी इतर काही कमाई नाही. बरं वाटू लागल्यावर तो गावाकडं जाऊ लागला. गावाकडं तीन एकर कोरडवाहू जमीन वाट्याला आलेली. तिच्यात काय करता येईल का ते पाहू लागला. मोठी बहीण मालू लग्न होऊन तिच्या घरी गेली. छोटी राणी, तिचं शिक्षण सुरू.

आईची तब्येत कुरकुर करत राहते. अशात देविदासला आपला ताण नको म्हणून मग त्यानं 'कमवा अन् शिका' पद्धतीने बी. ए. पूर्ण केलं.

त्याला पुण्यात येऊन पाच वर्षं झाली होती. घर सोडताना त्यानं त्याचं ध्येय ठरवलं होतं. एम.पी.एस.सी.मार्फत फक्त क्लास वनचीच नोकरी मिळवायची. पटवारी, ग्रामसेवक अशा थर्ड क्लास नोकरीच्या मागं अजिबात लागायचं नाही. कसून अभ्यास केला. अनेक परीक्षा दिल्या; पण मटका लावणाऱ्याचा आकडा जसा एका दाण्यानं मार खातो, तसं त्याचं होत गेलं. फार कमी फरकानं त्याची संधी प्रत्येक वेळी हुकत गेली अन् असंही घडलं, त्याच्या सोबत अभ्यास करायला लायब्ररीत येणारे अन् अभ्यास न करता मोबाइलवर सतत टुकारपणा करणारे चांगल्या मार्कांनी पास झाले. नोकरीवरही लागले. विनोद त्यातलाच एक नमुना.

पुण्यात खिशात पैसे नसताना दिवस काढणं महाकठीण. तरी त्याचे सुरुवातीचे काही दिवस भागले. नंतर पैसे संपले. खाण्याची कडकी सुरू झाली. पोटात काही नसताना दिवसभर लायब्ररीत बसणं कठीण होऊ लागलं. लायब्ररीवाल्याचं एक महिन्याचं पेमेंट थकलं. तोही वारंवार हटकू लागला. नाइलाजानं तो लायब्ररीला दांडी मारू लागला. काही तरी काम शोधू लागला. एक काम मिळालं. यशराज ट्रॅव्हल्सचं. रात्री साडेसात ते दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसातपर्यंत. वेगवेगळ्या ठिकाणांवरून येणाऱ्या आणि वेगवेगळ्या ठिकाणी जाणाऱ्या ट्रॅव्हल्सशी संबंधित लहान-मोठे कुरिअरचे डाग स्वीकारणं. वेगवेगळ्या ट्रॅव्हल्सशी संबंधित असलेले कुरिअर त्या त्या ट्रॅव्हल्समध्ये टाकणं. आलेल्या-गेलेल्या कुरिअरच्या व्यवस्थित नोंदी ठेवणं. कोणी डिलेव्हरीसाठी आलं, तर त्याचा डाग त्याला देणं, त्याच्या सह्या घेणं. हे काम संपल्यावर दिवसा लायब्ररी. त्याच्यावर फार ताण येऊ लागला. पण दुसरा इलाज नव्हता. पण हे काम फार दिवस टिकलं नाही. तिथं काम करणाऱ्या एकानं एका पार्सलचा घोळ केला. पार्टीनं मालकावर केस केली. परिणामी मालकानं विशालला दोन थोबाडीत देऊन हाकलून लावलं. या कामात दररोज दोनशे रुपये हाती पडत ते बंद पडले. नंतर तिथल्याच एक जणाकडून कळलं, की ज्यानं कुरिअरचा घोळ केला होता त्याला त्याचा चुलतभाऊ तिथं लावायचा होता. आणि त्यानं तो लावून घेतलाही. वास्तविक तो विशालला इतका गोड बोलायचा, की हद से पार. हा अनुभव त्याला खूप शहाणा करून गेला.

पुन्हा काम शोधायची वणवण. तो राहत होता त्याच परिसरात एका नामवंत इंजिनिअरिंग कॉलेजसमोरील नुक्कडवर बाहेरगावावरून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करायला आलेल्या मुलांनी सहकारी तत्त्वावर एक चहा, कॉफीची टपरी सुरू केली. त्यांना चहा-कॉफीची भांडी घासायला काम करणारा माणूस पाहिजे होता. विशालबरोबर लायब्ररीत एकाच स्टडी टेबलवर बसून अभ्यास करणारा जळगाव खान्देशचा पंकज पाटील त्या टपरीमालकांपैकी एक होता. विशालचा तो चांगला दोस्त होता. अडल्या-नडल्या वेळेला त्याला मदतही करायचा. विशालला काम हवं हे त्याला माहीत होतं. त्यानं विशालजवळ गोष्ट काढली. आंधळा मागतो एक डोळा अन् देव देतो दोन अशीच गत झाली विशालची. रात्री दहा वाजता सर्व भांडी घासून द्यायची. त्याबदल्यात दररोज दीडशे रुपये घ्यायचे. नवं काम सुरू झालं, पण विसाव्या दिवशी अचानक बंद पडलं. त्या मोहल्ल्याचा कुणी भाई आपल्या चार-पाच साथीदारांसोबत रात्री आठ वाजता आला अन् पंचवीस हजार रुपये मागू लागला. त्याचं म्हणणं, 'यहा धंदा करने का तो महिना पच्चीस हजार देना पडेगा.' पंकजच्या दोस्तांनी नकार दिला अन् त्यांनी डोळ्याचं पातं लवतं ना लवतं तो तिथला सारा पसारा एका टेम्पोत भरून नेला. हे करताना तिथं असलेल्या पंकजच्या दोस्तांच्या पोटाला चाकू लावले. पंकज तेव्हा गावाकडं गेला होता. विशालला त्या भाईचा तो बिनाभांडवली धंदा बरा वाटला. त्याच्या मनात आलं, आपल्यालाही जमायला पाहिजे असा धंदा.

शेवटी पंकजच्याच शिफारशीनं विशाल शहा इस्टेटवर येऊन चिपकला. शहा मुळात खान्देशातले. पंकजच्याच गावचे. त्यांची प्रियंका नावाची मुलगी अन् तिचा चुलतभाऊ विराज मॅट्रिकपर्यंत पंकजसोबतच गावातल्याच शाळेत शिकले. ते पुण्यात आल्यावरही पंकज त्यांच्याकडं येत जात होता. विराजच्या बोलण्यातून त्यांना एका नोकराची गरज होती, हे विशालला कळलं. त्यांच्याकडे चार जर्सी गाई होत्या. त्यांची देखभाल, दूध काढणं अशी सर्व कामं त्याला करावी लागतील हेही त्यांनी सांगितलं. विशाल तयार झाला. त्याची एकच अट होती रात्री आठ ते सकाळी सहा तो लायब्ररीत जाईल. त्याची अट मान्य तर केली गेली. मोबदला? सकाळचा नाष्टा, दुपारचं जेवण आणि पाच वाजता चहा, संध्याकाळचं जेवण. वरून तीन हजार रुपये महिन्याच्या महिन्याला. गेली चार वर्षं तो तिथंच काम करत होता. ही गोष्ट फक्त पंकजलाच

माहिती होती. तरी विनोद तिथं अचानक बंडूमामाला कसा घेऊन आला, तेच त्याला कळेना. कारण आपल्याबद्दल कोणालाही काहीही सांगू नये, असं विशालनं पंकजला निक्षून सांगितलं होतं. बरं, ते दोघं आले, तर विशालचा अवतार कसा? तो गाईंचा गोठा साफ करत होता. शेणानं हात भरलेले, कपड्यांवर शेणाचे डाग पडलेले. त्याला तशा अवस्थेत पाहून विनोदनं टोमणा मारलाच. 'क्लास वनची नोकरी मिळवण्यासाठी आधी अशी कामंही करावी लागत असतात का?' अस्सा राग आला! पण विशालनं तो गिळला.

हा बंडूमामा विनाकारण बारावीपासून त्याच्या मागं लागला होता. त्याच्या सुमीशी तो त्याला लग्न कर म्हणत होता. त्याच्या आईचा कुसुमचा त्याला मूक दुजोरा होता. पण त्याला त्याचं ध्येय साध्य झाल्याशिवाय लग्नबिग्न करायचं नव्हतं. बंडूमामा म्हणाला, ''लग्न झाल्यावर तू शिक. सुमी घरी बाईजवळ राहील. बाईले तिच्या कामात आधार व्हईल.'' विशाल बी.ए. पास झाल्यावर तर त्यानं वेगळाच प्रस्ताव मांडला होता. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या ओळखीनं तो त्याला त्यांच्या एका शाळेत शिक्षक म्हणून लावणार होता म्हणे. लागेल ते डोनेशन भरतो म्हणत होता. 'मामा, त्याच्यासाठी बी. एड. करावं लागतं,' असं विशालनं सांगितलं. तर म्हणाला, 'मंग तू बी. एड. कर. नाही तं मंग त्याच शाळंत कारकुनी कर.' बंडूमामाला काय माहीत, शाळेत चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरतीवर बंदी आहे. त्याला कसंही करून सुमी त्याच्या गळ्यात बांधायची होती. बस्स! तीच टेप पुन्हा वाजवण्यासाठी तो इतक्या वर्षांनंतर आताही आला असेल, असं विशालला वाटलं. पण बंडूमामानं तो विषय अजिबात काढला नाही. त्यानं जे सांगितलं ते भयंकर होतं. देविदासनं आणि त्याच्यासोबत कृषी उत्पन्न बाजार समितीत हमाली करणाऱ्या सावरखेडच्या शंकर वाघानं आणखी त्यांच्यासारखेच चार सोबती करून जिजामाता चौकातील कोपऱ्यावरची मोक्याची तोंडावर १५० फूट लांब अन् मागं तीस फूट रुंद जागा दहा वर्षांपूर्वी विकत घेतली होती. तिथं त्या सगळ्यांनी माती-विटांच्या भिंती उभारून टिनाची घरं बांधली होती. पैकी देविदासच्या एका बाजूला कोपऱ्यावर शंकर वाघ अन् दुसऱ्या बाजूला कृषी उत्पन्न बाजार समितीतील हमाली करणारा देविदासचा जिगरी दोस्त युसूफ होता.

बंडूमामा सांगत होता. कोणी बिशनशेठ देविदासकडं आला होता. याच बिशनशेठकडून त्यानं मालूताईच्या लग्नासाठी एक लाख रुपये कर्जाऊ घेतले

होते. आणि अव्वाच्या सव्वा पद्धतीनं ते त्यानं वसूल केले होते. हा बिशनशेठ म्हणजे शहरातली कुख्यात हस्ती. सुरुवातीला मटका किंग, नंतर पेट्रोल किंग, प्लॉटिंग किंग, बिल्डर किंग. आता अलीकडं हॉटेल किंग. स्वत: राजकारणी नाही. पण आमदार-खासदारांसकट जि.प., पं. स., न.प., सहकार अशा सर्वांच्या पाठीमागे 'मनीकिंग' म्हणून सदैव उभा राहतो. म्हणजे तो किंगमेकर. म्हणून आज तरी शहरात त्याला कुणीच चॅलेंज देऊ शकत नाही. त्याला जे हवं ते तो मिळवतोच. त्यासाठी तो समोरच्यावर साम-दाम-दंड-भेद यांपैकी कोणत्याही ट्रिक्सचा वाट्टेल तशा पद्धतीनं वापर करतो. शहरात एकल स्वरूपात किंवा झुंडशाहीमुळं कुठं काही अप्रिय घटना घडली, तर पोलीस तिचा संबंध पहिल्यांदा बिशनशेठशी लावतात. तर असा हा बिशनसिंग स्वत: म्हणे देविदासकडे आला होता अन् म्हणाला,'दोन लाख रुपये घे. अन् तुझं घर खाली कर.' देविदासनं मात्र नकार दिला. त्याच्या एका एजंटामार्फत त्याच्याकडूनच देविदासनं मालूच्या लग्नासाठी एक लाख रुपये घेतले होते. त्याचे त्यानं तीन लाख सतरा हजार परत केले होते. त्याचा देविदासला राग होता. बिशनशेठनं शंकर वाघचं घर एक लाख ऐंशी हजार रुपये देऊन खाली करून घेतलं. त्याच्या हाती दीड लाखच दिले. बाकी खरेदी झाल्यावर म्हणे. पण नंतर मात्र त्यानं ठेंगा दाखवला. ह्याच पद्धतीनं देविदासच्या घराच्या दुसऱ्या बाजूची युसूफच्या घरासकट बाकीची घरं त्यानं विकत घेतली. ती बुलडोजरनं पाडून जागा मोकळी केली होती. त्याला तिथं आलिशान हॉटेल उभारायचं होतं. कारण ही जागा सदैव गजबजलेल्या पुसद नाक्यापासून बरीच जवळ होती. तिथून रेल्वे स्टेशनही जवळ पडत होतं. त्याला आता मुख्य अडचण होती ती देविदासच्या जागेची. देविदास मात्र बिशनशेठच्या कोणत्याच गोष्टीला मान्यता देत नव्हता. बिशनशेठनं मग देविदासच्या नात्यागोत्याचा शोध घेतला. त्याचं गिऱ्हाईक असलेल्या जोगलदरीच्या बंडूची बहीण देविदासला दिलेली आहे, हे त्याला कळले. मग त्यानं बंडूमामाला निरोप दिला. 'तुझ्या मेहुण्याची जागा मला कोणत्याही हलातीत पाहिजे. त्याला तू समजावून सांग. तुझ्याच्यानं ऐकत नसेल, तर त्याची बायको, मुलगा-मुलगी, इतर कोणी नातेवाईक असतील त्यांना सांग. तुझा मेहुणा म्हणून तुला सांगतो. समेटानं ही गोष्ट घडली नाही, तर मी माझ्या पद्धतीनं जागा घेणारच. मग मी तुला बोलू देणार नाही.' बंडूमामाने ही गोष्ट देविदासच्या कानावर घातली.

तो काहीच बोलला नाही. कुसुमलाही सांगितली. ती काय बोलणार? देविदासनं तिला कोणत्याच गोष्टीसाठी कधीच तोंड उघडू दिलं नाही. बंडूमामानं गावाकडं मनोहरला सांगितलं. तो देविदासहून लहान. त्याचं त्यानं कधीच काही ऐकलं नाही. तशी कधी गरजही पडली नाही. आजोबा हयात असतानाच त्यांनी यांच्या घरा-शेतीच्या वाटण्या करून दिल्या होत्या. तरी त्यानं देविदासची भेट घेतली. अर्थात काही फरक पडला नाही. बंडूमामानं दिलीपमामांना म्हटलं. तर ते म्हणाले, 'पाव्हना लयच आडमूठ हाये. त्याले भेटून काही फायदा व्हनार नाही.' म्हणून मग शेवटी बंडूमामा विशालकडं आला. तो काकुळतीनं म्हणाला, 'तू घरी येत नाही हे मले माहीत हाये. मातर माह्यासाटी मनून एकदा चाल. तुह्या बापाची समजूत घाल. त्या बिशनसेटले भेट. इतकंय करून मव्हरं जे व्हयाचं ते व्हईल.'


बंडूमामा वापस गेला. पण विशालच्या जिवाला भलताच घोर लावून गेला. त्याची तगमग वाढवून गेला. ज्या बापानं त्याला बेघर केलं त्याच्यासाठी आपण जावं? खरं म्हणजे त्याला पॅरॉलिसिस झाला, तेव्हाही त्याची घरी जायची हिंमत झाली नव्हती. आणि आता आपण गेलो तर आपला बाप आपलं ऐकेल? कसं शक्य आहे? बरं दुसरी अडचण अशी, की पुढच्या आठवड्यात एक एम.पी.एस. सी.ची परीक्षा आहे. तिची तयारी करणं बाकी होतं. ती परीक्षा झाल्यावर जावं, असा एक विचार त्याच्या मनात आला. पण मग मधल्या काळात बिशनशेठनं देविदासबाबत भलतं काही केलं तर? आपल्याला त्याची गरज नसेल, पण कुसुम, राणी? त्याच्या माघारी त्यांचं कसं होईल? त्यापेक्षा एका दिवसासाठी जाऊन देविदासला सांगून पाहू. ऐकलं तर ठीक. नाही तर बिशनशेठची भेट घेऊन १०-१२ दिवसांनी आपण परीक्षा देऊन पुन्हा परत आल्यावर काय करायचं ते बघू असं सांगू. तोपर्यंत दम धरा अशी त्याला विनंती करू. म्हणून मग विशाल काल रात्री ट्रॅव्हलनं तातडीनं गावाकडं निघाला. 'चलो बासमवाले रेडी रहो.' कंडक्टरनं आवाज दिला. विशाल आधीच तयार होता. त्याच्याजवळ फारसं सामान नव्हतंच. सॅकमध्ये निकर, बनियन, टॉवेल, अंगावर घ्यायला एक शाल. आज संध्याकाळच्या ट्रॅव्हलनं त्याला परत जायचं होतं. बंडूमामाला त्यानं मी येत आहे, असं घरी कोणालाही सांगू नको म्हटलं होतं. त्यामुळे त्यानं दारात पाय टाकल्यावर आई, राणी यांना नक्कीच आश्चर्य वाटेल. देविदासचं काही

सांगता येत नाही. तो घरी असला, तर कदाचित घरात पायही टाकू देणार नाही किंवा घरात नसेल आणि आपण घरी गेल्यावर बाहेरून आला, तर आपल्याला घरातून बाहेरही काढेल. ते ऐन वेळेवर बघू काय होतं, असा त्यानं मनाशी विचार केला.

'ईईईई!!' एक मंजूळ आवाज विशालच्या कानावर पडला. वरच्या सिंगल बर्थवरून तो नुकताच खाली उतरला होता. त्याच्या बाजूच्याच बर्थवरून एक मॉड तरुणी किंचाळली होती. 'कसं उतरू?' ती स्वतःशीच पण मोठ्यानं बोलली. त्याला तिच्या नाजूकपणाची कीव आली. मनात एक थट्टेखोर विचारही आला. 'चंद्रयान -२च्या लँडर विक्रमसारखी उडी मार' असं तिला म्हणावं, असं त्याला वाटलं. नुकतंच ७ सप्टेंबरच्या मध्यरात्री १.३० ते २.३० या वेळात भारतानं कधी काळी पाठविलेल्या चंद्रयान -२च्या विक्रम नावाच्या लँडरनं चंद्राच्या दक्षिण धृवावर अलगद उतरण्याऐवजी तेथील जमिनीपासून २.१ किमी.वरूनच खाली एकदम उडी मारली होती. त्याची खूप चर्चा झाली होती. तसंच त्या तरुणीला कर, असं त्याला सुचवावंसं वाटलं. पण त्यानं तो विचार मनातच दाबला. बहुतेक तीही त्याच्यासारखीच पुण्यावरून आली असावी. तिचं किंचाळणं ऐकून कंडक्टर आला. 'क्या हो गया मॅडम?' त्यानं विचारलं. तिची उतरायची अडचण जाणून त्यानं तिला काही हिंट्स दिल्या. त्याप्रमाणे ती चाचपडत का होईना खाली उतरली. दिसायला स्मार्ट अन् राहणीला मॉड होती. तिनं तोंडावर स्टोल बांधला नव्हता म्हणून तिचा स्मार्टनेस कळला. नाहीतर आजकाल... तरुणी म्हटलं, की ती कशीही असो तोंडावर स्टोल असतोच. सारा फॅशनचा मामला. 'चलो साब, आगे आगे.' कंडक्टरनं विशालला सुचविलं. तो पाठीवर सॅक अडकवून पुढं निघाला. 'अकोला नाकाऽऽ' ड्रायव्हरनं ट्रॅव्हलचा वेग कमी करून पुकारा केला.

◆

## पुस्तकाच्या पानांतून



# राफिणू

## डॉ. संजय ढोले

*राजू फिरकेने आपल्या गावाच्या कोरोनामुक्तीसाठी केलेल्या वैज्ञानिक प्रयत्नांची यशोगाथा...कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील विज्ञान कादंबरी*

सकाळी नऊ वाजताच चौकात सगळे गावकरी जमा होत होते. रात्रीचा निरोप प्रत्येकालाच मिळाला होता. पंतप्रधानांचं संभाषणही बऱ्याच जणांनी ऐकलं होतं.

राजू, गुरुजी, रामभाऊ, हरिभाऊ येऊन बसले होते. रमेश, सुरेश, कुसुम सर्व परदेशी वाड्यालाही घेऊन आले होते. हळूहळू लोक जमा होऊ लागले. शीतल सिस्टर आणि डॉ. बागूल आले होते. डॉ. बागुलांचा चेहरा त्रासिक वाटत होता. शाळेतील शिक्षक पवार, शितोळे, खरे, बोरसे मॅडम, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थीही आले होते. निकम सरही आपल्या मग्रुरीतच येऊन बसले आणि हा काय वात्रटपणा आहे, असेच भाव त्यांच्या चेहऱ्यावर होते. आदिवासी बाया-बापडे आपापल्या पोरांना घेऊन आले होते.



काही खाली बसले होते, तर काही उभे होते. मोहम्मद खाटीकही होता. गोटू जयस्वाल, हिरालाल जयस्वाल, विलास जयस्वाल ही मारवाडी व्यापारी मंडळीही येऊन बसली होती आणि अजूनही येतच होते.

राजूनं पाहिलं. त्याला अपेक्षा नसताना बरीच माणसं आली होती. याचा अर्थ प्रत्येकाला कोरोना विषाणूचं गांभीर्य समजलं होतं किंवा पंतप्रधानांनी देशच बंद केल्याची अनामिक भीती त्यांच्या चेहऱ्यावर होती. पुढे काय? हा प्रश्न प्रत्येकाचाच होता. मोलमजुरांपुढे मोठं प्रश्नचिन्ह होतं. त्यासाठीच राजूनं रामभाऊंना ही बैठक घेण्याची विनंती केली होती.

जवळजवळ सर्वच गावकरी येऊन स्थानापन्न झाले. सरपंच रामभाऊ गुरुजींकडे पाहत म्हणाले, ''गुरुजी! बोलताय तुम्ही?''

''नाही रामभाऊ. या गावाचे प्रमुख तुम्ही आहात. तुम्ही आधी बोला.'' गुरुजींनी प्रोटोकॉल पाळला.

''बरं गुरुजी!'' सर्व गावकऱ्यांवर नजर टाकत रामभाऊ म्हणाले, ''गावकऱ्यांनो, आपण कशाला जमलोय, याची तुम्हाला कल्पना आलीच असेल. काल कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राला संदेश दिला. इतर देशांसारखा त्याचा प्रसार होऊ नये म्हणून पंतप्रधानांनी देशाची टाळेबंदी केलीय आणि संचारबंदी आणलीय. राजू पुढचं तुम्हाला सगळं समजावून सांगेल.'' रामभाऊंनी राजूकडे पाहिलं आणि त्याला पुढे बोलण्याचा इशारा केला.

राजूचं नाव निघताच डॉ. बागूल, निकम सर आणि इतर दोघा-तिघांच्या भुवया उगीचच उंचावल्या. त्यांच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट होती. राजू उभा राहिला आणि बोलायला सुरुवात केली. राजूचं वक्तृत्व अमोघ होतं.

''माझ्या सर्व गावकरी आणि माता भगिनींनो, रामभाऊ काकांनी तुम्हाला सांगितलंच की, आपण कशासाठी जमलोय. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात जगात वाढला आहे आणि त्याची सुरुवात आता भारतातही झाली आहे. सध्या आपण दुसऱ्या टप्प्यात आहोत, म्हणूनच तिसरा टप्पा



गाठण्याआधी पंतप्रधानांनी खूप छान पाऊल उचललंय आणि भारताची टाळेबंदी लागू केली. आता भारतातल्या सर्व राज्यांत प्रादुर्भाव वाढतोय. महाराष्ट्र त्यात अग्रेसर आहे, हे लक्षात ठेवा. कोरोना आपल्याकडे परदेशातूनच आलाय. एकाला जर कोरोनाची लागण झाली आणि त्याला वेगळं करून प्रतिबंध केला, तर तो पहिला टप्पा समजला जातो. कारण तो इतरांना कोरोनाबाधित करत नाही; पण ती व्यक्ती जर तशीच कुटुंबात वावरली, तर ती इतर चार जणांना बाधित करते आणि चार जणांना वेगळंच केलं नाही आणि उपचार दिले नाहीत, तर ते इतर सोळा जणांना लागण करतात. याला दुसरा टप्पा म्हणतात; पण हेच जर समाजात विखुरले गेले, तर ते गुणाकार निर्माण करून कोरोनाबाधित करतात आणि हा तिसरा टप्पा धरला जातो. याचाच अर्थ एक व्यक्ती, कुटुंब, समाज, साथ आणि देश पातळीवर त्याचा प्रसार होतो. पूर्ण समाजात जेव्हा विषाणू पसरतो, तेव्हा त्याला साथ म्हटली जात आहे, आणि सध्या आपण दुसऱ्या टप्प्यात आहोत. टाळेबंदीमुळे आपण घरातच याचा प्रसार थांबवू शकतो. एकमेकांचा संपर्क टाळू शकतो. पुढे कोरोनाविषयी सविस्तर माहिती शीतल सिस्टर देतील.'' राजूनं खूप छान सुरुवात केली होती. अतिशय सोप्या शब्दांत त्यानं सांगितलं होतं. आदिवासी स्त्रियांनाही ते समजलं होतं.

शीतल सिस्टरचं नाव घेताच, डॉ. बागूल उगीचच अस्वस्थ झाले. त्यांची चुळबुळ वाढली. शीतल सिस्टर त्याकडे दुर्लक्ष करत उठल्या आणि म्हणाल्या, ''राजूनं छान सुरुवात केलीय. मी थोडं कोरोनाविषयी तुम्हाला सांगणार आहे. त्याचं कारण म्हणजे  हा आपल्या प्रत्येकाच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे किंवा समस्त मानवसृष्टीवरच हे मोठं अरिष्ट आहे, म्हणून आपल्या अस्तित्वासाठी लढा द्यावाच लागेल. तुम्हा सगळ्यांची साथ हवी आहे.'' शीतल सिस्टरनं राजूकडे पाहिलं. राजूनं अंगठा उंचावून खूप छान संदेश दिल्याची खूण केली. शीतल सिस्टर पुढे उत्साहानं बोलू लागल्या, ''कोरोना विषाणू किंवा कुठलाही विषाणू कशानंही मरत नाही, कारण विषाणू हा सजीव नसतोच. विषाणू हा एक जैविक कण आहे, म्हणून कोणत्याही मानवी पेशीत हा विषाणू नावाचा कण गेला, की त्याच्या अनेक प्रती तयार होतात. जशा व्हॉट्सॲपवर कॉपी पेस्ट होतात, अगदी तशाच. विषाणू स्वत: प्रजनन करत नाही, तर ज्या पेशीत तो गेला आहे, ती पेशीच विषाणूच्या खूप साऱ्या प्रती किंवा कॉप्या तयार करतात.''

शीतल सिस्टर थोडा वेळ थांबल्या. सभोवर पाहिलं. गावकऱ्यांचीही उत्सुकता वाढत होती. राजूनं ही संधी घेतली आणि विचारलं,

"सिस्टर, नेमका हा विषाणू कशाचा असतो आणि संक्रमित कसा होतो?"

"राजू, विषाणू हा छोटासा डीएनए किंवा आरएनए असलेला एक कण असतो आणि त्यावर एक प्रोटिनचं संरक्षक आवरण असतं. ते प्रोटिनचं आवरण किती मजबूत आहे किंवा विषाणू ज्या पेशीत जाणार आहे, त्या पेशीशी ते किती समर्पक किंवा मिळतंजुळतं आहे, त्यावरून तो पेशीत संक्रमित होणार की नाही ते ठरतं."

"नेमकं कसं, सिस्टर?" रमेशनं धाडसानं विचारलं. राजूनं त्याच्याकडे पाहिलं. शीतल सिस्टरनंही सूचक पाहिलं. इतरांच्या मनातलाच तो प्रश्न होता. स्मित करत शीतल सिस्टर म्हणाल्या, "तेच मी सांगते. आपल्या पेशी नेहमीच आपल्याच डीएनएच्या कॉपी बनवत असतात. तीच पद्धत वापरून पेशीत गेल्यावर विषाणूमधला डीएनए किंवा आरएनए पेशीतले पदार्थ वापरून स्वतःच्या खूप कॉपीज तयार करतात. ही प्रत्येक कॉपी हा एक नवा विषाणू कणच असतो आणि मग पेशीतले पदार्थ संपले की, पेशींची भिंत फोडून हे सर्व विषाणू कण बाहेर येतात आणि शरीरातील इतर पेशींत घुसून त्यांनाही मारतात. अशा प्रकारे मग अनेक पेशी बाधित झाल्या, की यजमान म्हणजे ज्याच्या शरीराच्या पेशीत विषाणू संक्रमित झाला आहे, तो प्राणी किंवा मानव आजारी पडतो."

सर्वच शांतपणे ऐकत होते. विद्यार्थी, गावकरी समजून घेत होते. डॉ. बागूल मात्र अस्वस्थच होते. त्यांना हे रुचलं नव्हतं. ही माहिती त्यांनी देणं अपेक्षित होतं; पण त्याच वेळी शीतलचं ज्ञान बघून ते आश्चर्यचकित झाले होते. ते नुसतेच धुमसत होते. अशीच परिस्थिती निकम सरांची होती. जीवशास्त्राचे असले, तरी एवढी सखोल माहिती त्यांना नव्हती. तेही खजील झाले होते. त्यांचा स्वाभिमानच डिवचला गेला होता. कुणीही हालचाल करत नव्हतं की गडबड करत नव्हतं. प्रत्येकालाच अजून माहिती हवी होती. सरपंच रामभाऊ म्हणाले, "सिस्टर, सर्व कळलं बघा; पण यावर उपचार काय?"

"सध्या काहीच नाही. विषाणू हा सजीव नसल्यानं त्याला कोणत्याही औषधानं किंवा रसायनानं मारता येऊ शकत नाही. जो जिवंतच नाही, तर

त्याला मारणार कसं? पण एक मात्र निश्चित कशानंही त्याचं बाहेरचं प्रोटिनचं/प्रथिनांचं आवरण नष्ट झालं, की विषाणूही आपसूक नष्ट होतो. हे हवेमुळे, पाण्यामुळे, साबणामुळे किंवा तापमानामुळे, कशामुळेही होऊ शकतं. जर यजमानच मिळाला नाही, तर कुठलाही विषाणू जगातूनही नष्ट होऊ शकतो.''

शीतल सिस्टर थोडं थांबल्या. डॉ. बागूल अस्वस्थच होते. त्यांना काही रुचत नव्हतं. मुख्यत्वे शीतल हे सर्व सांगतेय, हेच त्यांना रुचत नव्हतं. त्यांनी मुद्दामच तिला कात्रीत पकडण्याच्या हेतूनं विचारलं, ''जर विषाणू मरूच शकत नाही, तर मग डॉक्टर जी औषधं देतात, ते मूर्ख आहेत का? किंवा विषाणूची लस शोधण्याचे प्रयत्न जे शास्त्रज्ञ करताहेत, ते वेडे आहेत का?'' डॉ. बागूल विजयी मुद्रेनं बघत होते.

शीतल सिस्टर डॉ. बागूल यांच्या या प्रश्नानं अस्वस्थ झाली. त्यांचं खोचक बोलणं तिला रुचलं नाही. ती नाराज झाली. तिनं राजूकडे पाहिलं. त्यानं सिस्टरला प्रोत्साहित करत बोलायला सांगितलं. शीतल पुढे म्हणाल्या, ''बरोबर आहे. विषाणूवर जी लस असते ती कशी काम करते, त्याआधी हा विषाणू कसा काम करतो ते सांगते, म्हणजे तुमच्या लक्षात येईल. खरं तर विषाणू आधी शरीराच्या पेशींच्या वॉलवर रिसेप्टर (ग्राहक) असतात, तिथे बाँड बनवतो आणि तिथेच चिकटून राहतो. त्या रिसेप्टर्समधून मग तो हळूच पेशींच्या आत जातो. आत तो आपल्या डीएनएच्या स्ट्रॅण्डचा प्रति डीएनए स्ट्रॅण्ड (पट्टी) बनवतो. हे स्टॅण्ड मग वेगळे होऊन, अजून स्ट्रॅण्ड बनवतात. हा प्रत्येक स्ट्रॅण्ड मग एक नवा विषाणू बनतो. मग या नव्या बनलेल्या विषाणू कणांची भरपूर संख्या झाली, की विषाणू त्या पेशींचे वॉल तोडून बाहेर येतात आणि बाजूच्या पेशींच्या रिसेप्टर्सवर जाऊन चिकटतात आणि त्यांना संक्रमित करतात. लस खऱ्या अर्थानं या सगळ्या स्टेप्सपैकी कोणत्याही एका स्टेपवर विषाणूला ब्लॉक करते. हे ब्लॉकिंग रिसेप्टर्सवर असू शकतं. त्या लसीत असं रसायन असतं, जे विषाणूंचं रिसेप्टर्सशी बाँडिंग होऊ देत नाहीत किंवा काही लसी विषाणूच्या डीएनएला रसायनांनी रोखून स्ट्रॅण्ड बनवू देत नाहीत. काही लसी विषाणूला वॉल तोडून बाहेर येऊ देत नाहीत. काही लसी विषाणूचा डीएनए बाद करून टाकतात आणि मग कॉपी तयार होत नाहीत. सर, मला वाटतं एवढं पुरेसं आहे.'' शीतल सिस्टर डॉ. बागुलांकडे पाहत म्हणाली.

डॉ. बागूल खजील झाले; पण राजू मध्येच म्हणाला,''नाही सिस्टर,

अजून मला वाटतं हे डॉ. बागुलांना पुरेसं नाही. मला माहिती आहे तेवढं मी ॲड करतो. आता कोरोना हा नवीन विषाणू आहे. त्याची नेमकी प्रथिनं आणि रिसेप्टर्सचे बाँड कसे असतात? तो नेमका कोणत्या पद्धतीनं शरीरात जातो किंवा तो कोणत्या रसायनानं डीएनए कॉपी बनवतोय, हेच अजून शास्त्रज्ञांना कळत नाहीये. रात्रंदिवस शास्त्रज्ञ प्रयत्न करत आहेत. हे कळल्यावर मग कोणतं रसायन त्याच्या कोणत्या स्टेप्सला रोखू शकतील, हे शोधायलाही वेळ लागेल म्हणून त्याची लवकर लस बनत नाहीये.''

''राजू, तुझं हे विज्ञान बरोबर आहे; पण या कोरोनाला आपण रोखायचं कसं? स्वत:ला जपायचं कसं?'' परशानं प्रश्न विचारला. परशा हा आदिवासी समाजातला होतकरू मुलगा होता. राजूपेक्षा वयानं थोडा मोठा; पण बऱ्याच प्रसंगांत राजूला तो नेहमीच मदत करत असे. राजू त्याच्याकडे पाहून स्मित करत म्हणाला,''परशा, तुझं बरोबर आहे. फार महत्त्वाचं आहे. शिवाय शीतलताईंनी आपल्याला छान माहिती करून दिलीय. म्हणून कोरोनापासून आपणच स्वत:ला वाचवू शकतो. त्यात मुख्य म्हणजे आपले हात निर्जंतुक किंवा साबणानं धुतल्यानं विषाणूचं प्रोटिन कवच नष्ट होऊन तो वाढू शकत नाही. शिवाय तो जड असल्यानं फार काळ राहू शकत नाही. हवेत दोन-तीन तास राहतो. महत्त्वाचं म्हणजे जो कोणी शिंकतो किंवा खोकत असेल, त्याच्यापासून तीन फूट दूर राहणं, हा रामबाण उपाय आहे. कारण शिंकेतल्या पाण्याच्या थेंबांतून तो संक्रमित होऊ शकतो, म्हणून स्वत:ला एकमेकांपासून आणि आजारी व्यक्तींपासून वेगळं ठेवणं महत्त्वाचं आहे. शेवटी स्वच्छता राखणं, लक्षणं दिसणाऱ्या माणसापासून दूर राहणं, खोकताना किंवा शिंकताना नाक आणि तोंड रुमालानं झाकणं, संक्रमण झालेल्या शहरात न जाणं, संक्रमित झालेल्या माणसाच्या संपर्कात न येणं, जिवंत प्राण्यास स्पर्श न करणं, अशी काळजी घेतली की आपण कोरोनाला दूर ठेवू शकतो आणि हाच सध्या आपल्यासमोर एकमेव पर्याय आहे. हे गाव आपण कोरोनापासून वाचवू शकतो.''

''राजू, फक्त शेवटचा प्रश्न,'' गुरुजी प्रथमच बोलत होते.

''बोला ना, दादा.''

''या विषाणूचा मृत्युदर किती आहे?''

''दादा, खूपच छान प्रश्न आहे. हा दर साधारण ३.५ टक्के एवढा आहे,

म्हणजे संक्रमित हजार माणसांत ३५ जणांचा मृत्यू ओढवू शकतो. यात ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त असू शकते, कारण त्यांची प्रतिकारशक्ती कमी असते. तर मला वाटतं आपण सर्व जण एकजुटीनं या विषाणूचा सामना करू या आणि आपल्या गावाला संक्रमणापासून रोखू या.'' राजू आत्मविश्वासानं उत्तरला.

''निश्चितच राजू! आम्ही सर्व तुझ्यासोबत आहोत.'' हरिभाऊ सद्‌गदित होत म्हणाले.

''राजूभाऊ, एक विचारू?'' समोरून एका आदिवासीनं विचारलं.

''बोला ना काका?'' राजू आदरानं म्हणाला.

''आम्ही मजुरी करणारी माणसं. हातावर आमचं पोट. आता कामही बंद होईल. अगदी घरात बसून जगायचं कसं?'' आदिवासींचा प्रश्न वस्तुस्थितीला धरून होता.

राजूनं यावर आजूबाजूला पाहिलं. गोटूलाल जसस्वाल पुढे येत म्हणाला, ''आम्ही आहोत ना. आमची दुकानं आहेत. गरजेपुरतं मी तुम्हाला लागेल ते दान करायला तयार आहे. आम्ही कुणालाही कमी पडू देणार नाही.''

गोटूची भूमिका पाहून सारेच हेलावले. त्यानं गावच दत्तक घेतलं होतं. इतर व्यापारी हिरालाल, विलास, सुरजित मारवाडी आणि छोटे-मोठे दुकानदारही पुढे आले आणि मदतीचा हात पुढे केला. मोठाच प्रश्न सुटला होता. राजूचं मन भरून आलं. गुरुजी आनंदित झाले, तर रामभाऊ आणि हरिभाऊंचा चेहरा अभिमानानं भरून आला. राजू म्हणाला, ''कुणीही घाबरू नका. या सगळ्यांनीच तुमची जबाबदारी घेतली आहे. घरोघरी जाऊन पुन्हा काळजी कशी घ्यायची, हे माझे मित्र सांगतीलच. तुम्हा सर्वांची जबाबदारी सरपंच या नात्यानं रामभाऊ काका आणि पोलीस-पाटील म्हणून हरिभाऊ काकांची आहे.''



रामभाऊ त्यावर म्हणाले, ''होय राजू, आपण कुणालाही कमी पडू देणार नाही. सर्वच एकमेकांना आहेत.''

''शिवाय गावकऱ्यांना माझी एक विनंती आहे.

जसे दिवस जातील, तसे आपल्याला प्रत्येकाच्या मदतीची गरज लागेल. प्रत्येकानंच गावाच्या सुरक्षेसाठी हातभार लावावा.'' राजूनं सर्वांकडे पाहत अपेक्षा व्यक्त केली. मुख्यत्वे शिक्षित लोकांकडून. त्यात निकम सर म्हणाले, ''हे बघा! मुळात मी इथे राहणार नाही. माझं कुटुंब आणि मी शहाद्यालाच राहणार आहे. तुम्ही तुमचं बघा.''

''सर! तुमची या गावाप्रति काही कर्तव्यं आहेत. तुम्ही इथे नोकरी...''

''हे बघ, मला कर्तव्य शिकवू नकोस. मी काहीही मदत करणार नाही आणि थांबणार नाही.'' मध्येच निकम सर त्वेषानं आणि अंतिम बोलले.

''मी सुद्धा शहाद्यालाच राहणार आहे. कनसाई गावात राहण्याची मला जोखीम वाटतेय. काही झालंच तर इथे वैद्यकीय सुविधा नाहीत.'' डॉ. बागूलही त्वेषानं म्हणाले.

''सर! पण तुम्ही स्वत: डॉक्टर आहात. खऱ्या अर्थानं पुढे तुमचीच गरज गावाला लागेल. तुम्ही तशी शिकताना शपथही घेतलीय.'' राजूनं आठवण करून दिली.

''ए, मला शिकवण्याची गरज नाही. मी बघून घेईन आणि सेवेसाठी ही नर्स आहेच की. मी येणार नाहीये. मला गृहीत धरू नका.'' डॉ. बागूल ठामपणे म्हणाले.

राजू हवालदिल झाला. रामभाऊ, हरिभाऊ, गुरुजी पाहतच राहिले. अजून दोघा-तिघांनी असमर्थता दर्शवली. पवार, शितोळे, खरे आणि बोरसे मॅडमनी मात्र आश्वासित केलं. शहाद्याला जरी राहत असलो, तरी हाक मारली की हजर होऊ म्हणून सांगितलं. राजूला बरं वाटलं; पण निकम सर आणि डॉ. बागुलांचं वागणं अनाकलनीय होतं. राजूनं दुर्लक्ष केलं. एखाद्याला काहीच करायचं नाही, म्हटल्यानंतर तो तरी काय करणार होता.

हरिभाऊंनी सगळ्यांचे आभार मानले. सगळे आता आपल्या घरात राहणार होते. गल्ली, रस्ते निर्जन होणार होते. येथून प्रवास सुरू झाला होता. राजूनं कोरोनाविरुद्ध दंड थोपटून यशस्वी सुरुवात तर केलीच होती.

◆

पुस्तकाच्या पानांतून




# क्युअर्ड

**डॉ. जेफ्री रेडिगर**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

*शारीर आजारावर मानसिक आरोग्याच्या दिलासादायक मात्रेचा मूलमंत्र देणारं अफलातून पुस्तक*

## हृदयी वसंत फुलताना...

*शरीर हे मनाचे साधन आहे... आणि मन हे हृदयाचे.*

–हजरत इनायत खान



खगोलशास्त्रामध्ये, भौतिकशास्त्रज्ञ अद्याप ज्यापर्यंत पोहोचता आलेले नाही अशा ग्रहांबद्दल बोलत असतात – जे ‘गोल्डीलॉक्स प्लॅनेट्स’ असल्यामुळे त्यावर जीवन असू शकते, जिथे फार उष्ण नाही, फार थंड नाही असे अगदी योग्य वातावरण असू शकते. तिथल्या वातावरणात जीवनाचे अंकुर रुजतात, वाढतात व बहरतात. ‘पॅरासिंपथेटिक’ आपले ‘गोल्डीलॉक्स प्लॅनेट’ असतात. या मानसिक व

शारीरिक अवस्थेत आरोग्य मिळवणे व बरे होणे यासाठी परिस्थिती अगदी परिपूर्ण असते.

ही गोष्ट किती दुर्मिळ आहे याबद्दल तुम्हाला कोणताही खगोलशास्त्रज्ञ सांगू शकेल–या ब्रह्मांडातील अब्जावधी ग्रहांपैकी अगदी डझनभर ग्रह 'गोल्डीलॉक्स प्लॅनेट्स' ठरले आहेत. कधीकधी असे वाटते की, आजच्या जगात 'पॅरासिंपथेटिक'मध्ये जगता येण्याची शक्यता अगदी धूसर आहे आणि तरीही, आरोग्याच्या संदर्भात काही अपवादात्मक यशस्वी लोक हे साध्य करण्याचा मार्ग शोधत आहेत आणि आपल्याला पुढील रस्ता दाखवत आहेत. ते आपले अग्रदूत आहेत.

आपण आदल्या प्रकरणात पाहिले की, 'रिलॅक्सेशन रिस्पॉन्स'सारखे मार्ग तुमच्या मज्जासंस्थेचा काटा अल्पावधीसाठी 'पॅरासिंपथेटिक'कडे झुकवू शकतात आणि त्यामुळे बराच फरक पडतो. पण आपल्यापैकी बहुतेक जण या स्थितीत पुरेसा वेळ राहू शकत नाहीत, त्यामुळे शरीराला खऱ्या अर्थाने बरे होण्याची फारशी संधीच मिळत नाही. आणि आपण असे मार्ग शोधायला हवेत, जे सर्व प्रकारच्या लोकांना उपयोगी पडतील–असे मार्ग जे आपल्या नित्य कामांच्या यादीतले आणखी एक काम वाटणार नाहीत. उदाहरणार्थ, सगळ्या व्यक्ती काही 'ध्यानधारणा' करणाऱ्या नसतात आणि माझा अनुभव तर असा आहे की, ध्यानधारणा करणाऱ्या व्यक्तीसुद्धा नियमित ध्यान करण्याबाबत कटाक्ष ठेवत नाहीत. मी तर नक्कीच नाही! 'रिलॅक्सेशन रिस्पॉन्स' ही गोष्ट नीट केली, तर ती पहिली मोठी पायरी ठरू शकते. पण स्वयंस्फूर्त रोगमुक्तीच्या उदाहरणांवरून आपल्याला दिसते की, 'हीलिंग' फक्त 'रिलॅक्सेशन'पेक्षा बरेच काही असते.

स्वायत्त मज्जासंस्थेचा भाग आपले सबोध नियंत्रण नसणाऱ्या भागावर – सिंपथेटिक व पॅरासिंपथेटिक, दोन्ही अनैच्छिकपणे काम करतात. आपण फक्त पॅरासिंपथेटिकमध्ये कसे जायचे याचा विचार करू शकत नाही. मग आपण गिअर कसा बदलायचा आणि 'हीलिंग' मोडवर कसे राहायचे?

## गाडी चालवायला पुन्हा शिकताना

तुम्ही ताणतणावाचे व्यवस्थापन, तणाव दूर करणे अथवा ताणतणाव यांकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन बदलणे यांद्वारे स्वतःला 'पॅरासिंपथेटिक मोड'वर

जायला शिकवू शकता. पण एकदा तुम्ही त्यामध्ये गेलात की त्या यंत्रणेला कार्यरत राहण्यासाठी इंधन लागते. जर इंधनाची टाकी रिकामी असेल, तर तुम्ही 'रिलॅक्सेशन रिस्पॉन्स एक्सरसाइज' करून उठल्याबरोबर 'हीलिंग मोड'मधून बाहेर पडू शकता आणि पॅरासिंपथेटिकसाठी इंधन म्हणजे : प्रेम व नातेसंबंध.

हे वेडगळपणाचे वाटते आहे? सुरुवातीला मला तसेच वाटले होते. हे अगदी साधेसोपे वाटते आणि काही अर्थांनी ते तसे आहेच. अनेक वर्षांपासून संशोधनाचे निष्कर्ष दाखवून देत आहेत की, इतरांबद्दलच्या व स्वत:बद्दलच्या प्रेमामुळे आणि इतर लोकांशी नातेसंबंध जोडण्यामुळे तुम्ही अधिक आरोग्यसंपन्न राहता, तर अशी नाती व भावबंध नसतील तर ते तुमच्या रोगप्रतिकार यंत्रणेसाठी वाईट ठरू शकते. मी इथे दृढ भावबंधांबद्दल बोलत नाहीये, तुम्ही तुम्हाला भेटणाऱ्या प्रत्येक माणसाच्या प्रेमात पडावे, असा याचा अर्थ नाही. अगदी 'सूक्ष्म-बंध' अनुभवण्याचे क्षणसुद्धा प्रेमाचे जबरदस्त कॉकटेल तयार करू शकतात, पॅरासिंपथेटिक प्रक्रियेला गती देऊन तिला इंधन पुरवून ती कार्यरत ठेवू शकतात.

मी पहिल्यांदा ब्राझिलला गेलो होतो, त्यानंतर काही महिन्यांनी एक अमेरिकी तरुण पाठीवर कपड्यांची पिशवी लावून तिथे आला. त्याच्या तुळतुळीत केलेल्या डोक्यावर जे खुंट वाढले होते, त्याखाली त्याच्यावरच्या अयशस्वी शस्त्रक्रियेचा (रेडिओसर्जरी) ठळक व्रण दिसत होता, ती जखम अद्याप भरलेली नव्हती. त्याच्या खिशात फार पैसे नव्हते आणि त्याच्या आयुष्याचे तीन महिने उरले होते.

२००३ साली तो तरुण, मॅट आयर्लंड विशीच्या दरम्यानचा होता. कॉलेजमधून पदवीधर होऊन बाहेर पडल्यानंतर तो टेलूराईड, कोलोरॅडोमध्ये नोकरी करत होता. ही नोकरी त्याला हवी तशी होती – साहसी क्रीडाप्रकारांची. ही कंपनी खडकाळ पर्वतरांगांत वसलेली होती. हिवाळ्याच्या दिवसांत तो 'स्की टूर्स' घ्यायचा, उन्हाळ्यात 'माउंटन बाईकिंग' असायचे. जेव्हा कुणी पर्यटक नसायचे तेव्हा तो पर्वतावर मैलोन्‌मैल जाणाऱ्या पायवाटा साफ करण्याचे काम दिवसभर करत असायचा. ते ठिकाण सुंदर होते आणि तो खूश होता – किमान सुरुवातीला तरी. पण नंतर एका विशिष्ट टप्प्यावर त्याचा मूड बदलला, त्याच्या मनावर मळभ दाटले, त्याला अतिशय एकाकी वाटू लागले, त्याच्या आजूबाजूला त्याचे इतर सहकारी असूनही व ते त्याला

आवडत होते तरीही. तो विचित्र आणि धक्कादायक नैराश्याच्या गर्तेत बुडाला होता.

''मला तशा प्रकारची भावना याआधी कधी घेरून आली नव्हती,'' तो आता सांगतो. ''मी इतका खूश असल्याबद्दल लोक नेहमी माझी चेष्टा करायचे.''

त्याचे बदलते मूड हे त्याच्या मेंदूशी संबंधित गंभीर समस्येचे पहिले लक्षण होते. त्याला डोकेदुखीचा त्रास सुरू झाला होता. हा त्रास त्याला नेहमी ठरावीक वेळीच सुरू व्हायचा : सकाळी १० वाजता. तो आणि त्याचे सहकारी त्या दिवसाच्या कामासाठी सज्ज होत असायचे त्याच वेळी. सुरुवातीला काही दिवस त्याने या त्रासाकडे दुर्लक्ष करायचा प्रयत्न केला. त्याला तीव्र डोकेदुखीचा त्रास होत नव्हता, पण ही डोकेदुखी काहीतरी विचित्रच होती. हे सामान्यत: जसे डोके ठणकते तसे नव्हते किंवा 'आयबुप्रोफेन' घेतली की ते दुखायचे थांबतही नव्हते. ही डोकेदुखी त्याच्या डोक्याच्या आतमध्ये खोलवर कुठेतरी होती, ज्या ठिकाणी त्याला याआधी कधी कुठल्या प्रकारची संवेदना जाणवली नव्हती. हे दुखणे त्या ठिकाणी बंदुकीची गोळी रुतून बसावी तसे मुक्कामाला आले होते आणि दिवसागणिक त्या दुखण्याची तीव्रता वाढत होती. काही दिवसांनी त्याला पर्वतावर जाऊन काम करणे अशक्य झाले. त्याला भोवंडल्यासारखे होत होते, मळमळत होते आणि अशक्त वाटत होते. दर चोवीस तासांनी ही डोकेदुखी उफाळत होती आणि प्रत्येक खेपेला तिची तीव्रता वाढत चालली होती. त्याला उलट्या होऊ लागल्या होत्या, दुखण्याने तो हैराण झाला होता. मग त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला डॉक्टरकडे जायला लावले आणि अखेर तो भयभीत होऊन डॉक्टरांना दाखवायला गेला.

त्याच्या दुखण्याचे निदान करायला डॉक्टरांना फार वेळ लागला नाही. एमआरआयमध्ये त्याच्या 'ऑप्टिक नर्व्ह' (दृकतंत्रिका) वर एका भल्यामोठ्या गाठीचा दाब येत असल्याचे दिसले. ती गाठ कसली आहे ते त्यांना माहीत नव्हते, पण त्यांनी मॅटला ''ही गाठ ताबडतोब काढून टाकायला पाहिजे, नाहीतर ती तुझा जीव घेईल'' असे सांगितले.

मग त्यांनी त्याच्या डोक्यावरचे केस काढून टाकले, त्याला शस्त्रक्रियेसाठी सज्ज केले. त्याला ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले.

''शंभरपासून उलट्या दिशेने आकडे मोजा,'' निळ्या मास्कमधून भूलतज्ज्ञ

बाईंचा दबका आवाज आला. त्याला शेवटचा विचार आठवतोय तो म्हणजे... आता आपण मरणार...

त्याला जेव्हा जाग आली, तेव्हा त्याला आपण अजून जिवंत आहोत या गोष्टीचे आश्चर्य वाटले. त्याच्या डोक्यात एक नळी बसवली होती, त्यातून द्रव बाहेर पडत होते. त्याच्यावर भूलीचा परिणाम होता आणि त्याचे डोके ठणकत होते.

शल्यविशारदांनी त्याला शस्त्रक्रिया व्यवस्थित पार पडल्याचे सांगितले. त्यांनी गाठीचा बराचसा भाग काढून टाकला होता व तो त्यांनी 'बायॉप्सी'साठी पाठवला होता. दरम्यान त्याची डोकेदुखी थांबणार होती. ते शल्यविशारद आशावादी दिसत होते. त्यांनी सुरुवातीला मेंदूच्या कर्करोगाचे निदान केले होते – पण फार वाईट प्रकारच्या नव्हे. मॅटला पहिल्या किंवा दुसऱ्या स्टेजचा कर्करोग असेल, पण त्यावर उपचार करणे शक्य होईल, असा त्यांचा अंदाज होता.

मात्र काही दिवसांतच मॅटची गाडी उलट्या दिशेने गेली. तो शस्त्रक्रियेतून बरा होत असला, तरी गाठ पुन्हा वाढू लागली होती. मग त्यांनी पुन्हा 'बायॉप्सी' केली, 'क्रेनियल फ्लुईड' (कपालद्रव)चे नमुने घेतले. त्यानंतर दोन आठवड्यांत त्यांनी सुधारित निदान दिले. या खेपेला कसलाही आशावाद नव्हता, ''आपण हे बरे करू'' असा आनंदी सूर नव्हता. हे नवे निदान म्हणजे मृत्युदंडच होता : 'ग्लिओब्लॅस्टोमा मल्टिफॉर्म, स्टेज फोर.'

या प्रकारच्या कर्करोगासाठी उपयोगी पडू शकेल असा कुठला उपचार नव्हता – तो बरा करेल असा कुठलाही उपाय नव्हता. कर्करोगाचे लांब संस्पर्शक (टेन्टॅकल्स) मेंदूच्या पेशीत खोलवर गेले होते, त्यामुळे ती गाठ पूर्णत: काढून टाकणे अशक्य बनले होते. या आजारात रुग्ण जिवंत राहण्याचा सरासरी कालावधी बारा ते अठरा महिने आहे. या आजाराचे निदान झालेल्या रुग्णांपैकी फक्त दोन ते पाच टक्के रुग्ण पाच वर्षे उलटल्यावर अजून जिवंत आहेत. या आजारातून कुणीही जिवंत वाचत नाही असे शिकवले जाते.

मग मॅटच्या डॉक्टरांनी त्याला 'किमो'चा कोर्स घ्यायला सांगितला. पण त्याचा उद्देश आजाराच्या वाढीचा वेग कमी करणे एवढाच होता. त्याला उपशामक उपाय म्हणून 'लेसर थेरपी' ही सुचवण्यात आली. त्याची आयुर्मर्यादा आणखी थोडी वाढावी यासाठी... आणखी थोडा वेळ मिळावा यासाठी वेळ. तो पर्वतराजींमध्ये वृक्षांच्या रांगेजवळ उभा असायचा, तेव्हा दूरवर क्षितिजापर्यंत

जाणारी ही वाट कधी संपणारच नाही, असे वाटायचे. पण आता त्याला फार अंतर कापता येणार नव्हते.

तो हंगामी कर्मचारी असल्यामुळे त्याचा आरोग्यविमा नव्हता. या शस्त्रक्रियेने त्याची तुटपुंजी बचत संपवली होती, त्यानंतरही खर्च सुरूच होता. त्याच्या मित्रांनी त्याला रोख रकमेची मदत केली होती, पण हॉस्पिटल वगैरेंची अव्वाच्या सव्वा बिले भागवल्यावर त्याच्या हातात फारसे काही उरले नव्हते. मग तो व्हेरमॉन्टला त्याच्या घरी परत आला व त्याच्या आईसोबत राहू लागला. आता कुठल्याही प्रकारचे उपचार घ्यायचे म्हटले तरी आपल्या हातात फक्त काही आठवडे किंवा महिने उरले आहेत, हे त्याला माहीत होते. तसेच या उपचारांच्या 'साइड इफेक्ट्स'मुळे कमजोरी येऊ शकते हेही तो जाणून होता, पण त्याला मिळवता येईल तेवढा वेळ मिळवायचा होता. मग त्याने रेडिओथेरपी व किमो दोन्हीही घ्यायला सुरुवात केली, तसेच डार्टमाऊथमधल्या एका सर्वोत्तम क्लिनिकमध्ये नव्या, प्रायोगिक 'गॅमा किरण रेडिओसर्जरी' पर्याय त्याच्यासमोर आला, तेव्हा त्याने तोही घेतला.

पण त्याला 'किमो' घेणे म्हणजे शरीरात विष पसरल्यासारखे वाटत होते. त्याला हा प्रकार तसाच वाटू लागला. त्यामुळे त्याला आजारल्यासारखे, संवेदना बधिर झाल्यासारखे वाटत होते. त्याचे वजन झपाट्याने घटले. त्याने काहीही खाल्ले तरी ते एकाच चवीचे लागत होते – भयंकर.

''चमचाभर साखर व चमचाभर मीठ... दोन्हीही एकाच चवीचे लागत होते,'' तो सांगत होता. ''राखेसारखे.''

त्यानंतर, पाब्लो केलीप्रमाणेच मॅट, पहिल्यांदा आहार या मुद्द्याकडे वळला. त्याने 'बीटिंग कॅन्सर विथ न्यूट्रीशन' हे पुस्तक वाचले. त्यातून त्याला समजले की, कर्करोगाच्या रुग्णांमधील पाचपैकी एक रुग्ण कर्करोगाने नव्हे तर कुपोषणाने मरतो. कॅकेक्सियामुळे (गंभीर रोगाने व चिंतेने होणारा रोग) शरीराच्या कर्करोगाशी लढण्याच्या व बरे होण्याच्या क्षमतेवर गंभीर परिणाम घडतो. 'नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट'च्या अंदाजानुसार, यामुळे कर्करोगाच्या वीस टक्के रुग्णांचा मृत्यू होतो. हे रुग्ण अखेर या आजारामुळे संपलेच असते अशी शक्यता आहे, पण जेव्हा कुपोषण इतक्या लोकांना त्या टप्प्यापर्यंत पोहोचण्याआधीच संपवते, तेव्हा काही कळायला मार्ग नसतो.

मग आजारातून बऱ्या झालेल्या अनेकांप्रमाणेच मॅटनेही पोषणदृष्ट्या

सर्वांत समृद्ध अन्नसेवनावर मुख्य लक्ष केंद्रित करायचे ठरवले. जर आपल्याला बरे होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करायचे असतील किंवा या पृथ्वीतलावर उरलेल्या अल्प काळात आणखी चार दिवसांची भर घालायची असेल, तर त्याला हा मार्गच कामी येईल असे वाटत होते.

दोन आठवड्यांनी त्याच्या लक्षात आले की 'किमो'चा आपल्याला काहीही उपयोग होणार नाही.

''माझं जे काही आयुष्य उरलं होतं, त्याचीही त्यामुळे वाट लागत होती,'' तो सांगत होता. मग त्याने त्या गोळ्या संडासात टाकून दिल्या.

त्याला 'रेडिओसर्जरी'कडून खूप अपेक्षा होत्या. डार्टमाऊथमधल्या डॉक्टरांना हा ग्लिओब्लास्टोमावरील उपचाराचा नवा, सनसनाटी मार्ग ठरू शकेल असे वाटत होते. पण ही प्रायोगिक नवी शस्त्रक्रिया-ज्यामध्ये विशेष प्रकारच्या लेसरचा उपयोग करून झपाट्याने वाढणाऱ्या गाठीला अचूक लक्ष्य केले जात असे – 'रेडिएशन थेरपी'सारख्या इतर उपायांपेक्षा फार उपयोगाची ठरली नाही.

त्यानंतर अचानक एके दिवशी त्याच्या शेजारणीचा त्याला त्याच्या आईच्या घरी फोन आला. तिला गावातल्या काही मित्रांकडून त्याच्याबद्दल कळले होते. तिची मॅटला मदत करायची इच्छा होती. तिने सांगितले की, तिलाही कर्करोग झाला होता, पण ब्राझिलमधल्या 'हीलिंग सेंटर'मध्ये जाऊन आल्यानंतर ती बरी झाली होती. तिने तिथल्या समुदायाबद्दल त्याला सांगितले... तिथे येणाऱ्या लोकांना प्रेम व आपल्याला स्वीकारल्याची भावना जाणवते हे सांगितले आणि आपण बरे होऊ शकतो असा खरोखर विश्वास जागतो, या स्वत:ला बदलून टाकणाऱ्या अनुभवाबद्दल सांगितले. तिने त्याला घरी येण्याचे आमंत्रण दिले, त्याला चहापान दिले. तिने त्याला तिच्या शस्त्रक्रियेचे व्रण दाखवले. तिलाही त्याच्यासारखाच असाध्य कर्करोग झाला होता.

ते ऐकून त्याला तिथे जावेसे वाटले, पण ब्राझिलला जाण्याचा खर्च त्याला परवडणारा नसल्याचे त्याने तिला सांगितले.

''हे बघ,'' तिने सांगितले, ''तुझ्या मनातल्या सगळ्या शंका-कुशंका काढून टाक. जर तुझं मन तुला तिथे जा म्हणून सांगत असेल, तर मी तुला तिकीट काढून देईन.''

तो तिच्या बोलण्यावर विचार करत होता – सिंकच्या वरच्या बाजूला लावलेले घड्याळ मंद टिकटिकत होते. बऱ्याच लोकांनी त्याला काय करावे,

कुठले खास उपचार घ्यावेत अथवा कोणती रणनीती आखावी याबद्दल सांगितले होते; पण पैशाच्या किंवा आरोग्यविम्याच्या भक्कम पाठिंब्याच्या अभावी या सगळ्या गोष्टी त्याला आवाक्याबाहेरच्या वाटल्या होत्या.

''ओके,'' तो म्हणाला, ''हो, मला जायचं आहे. मी गेलंच पाहिजे.''

त्याची डार्टमाऊथमध्ये प्रायोगिक 'रेडिओसर्जरी' घेऊन झाली. मग त्यांनी गाठ वाढली आहे का हे पाहण्यासाठी एमआरआय केले, त्यामध्ये गाठ वाढण्याचा दर किंचित कमी झाल्याचे आढळले. त्यांनी मॅटला सांगितले की, आम्ही तुला आणखी काही महिने आयुष्य मिळवून दिले आहे–'ग्लिओब्लॅस्टोमा मल्टिफॉर्म'च्या पार्श्वभूमीवर तर हा विजयच होता – आणि त्यांनी त्याला शस्त्रक्रियेचा घाव भरल्यानंतर प्रवासाला जा, तोवर थांब, असे सांगितले.

ब्राझिलला जाण्याबद्दल त्याच्या मनात काही शंका होत्या का... जो व्यर्थ प्रयत्न ठरू शकला असता?

''अर्थातच होत्या,'' तो म्हणाला.

''पण मला काहीतरी करावंच लागणार होतं,'' तो सांगत होता, ''मी तसाच घरात बसून मृत्यूच्या दाढेत जाणार नव्हतो.''

ब्राझिलमध्ये गेल्यावर, तिथे त्याने गावाच्या एका टोकाला एक स्वस्तातले 'पुसाडा' भाड्याने घेतले. तिथल्या लाकडी दारातून त्याला पक्ष्यांचा कर्कश कोलाहल ऐकू येत असे. तिथे पहिल्या रात्री त्याला एक स्वप्न पडले, तो क्षण त्याला आजही अगदी बारीकसारीक तपशिलांसह आठवतो. त्याला ते आठवण्याचे कारण म्हणजे आपण त्या वेळी जागेच होतो असे त्याला वाटते... सगळ्या गोष्टी कशा स्पष्ट व खऱ्याखुऱ्या होत्या किंवा कदाचित ते स्वप्न नसेलच, ते त्याचे कल्पनाचित्र असेल. त्याला नक्की सांगता येत नाही...

त्या रात्री त्याला मध्येच जाग आली... किंवा स्वप्न पडले. तो बिछान्यात उठून बसला तेव्हा त्याच्या लक्षात आले की बाथरूममधला दिवा सुरू आहे.

''अरेच्चा...,'' त्याच्या मनात आले, ''दिवा बंद करायला पाहिजे.''

पण तो जागचा हलण्याआधीच, त्या दिव्याची जागा बदलली आणि तो लुकलुकू लागला... आजूबाजूला कुणीतरी चालत आहे असे त्याला वाटले... आणि मग एक आकृती प्रकटली... एका स्त्रीची. ती त्या प्रकाशात इतकी न्हाऊन निघाली होती की, त्याला ती नीट दिसतही नव्हती. ती स्त्री त्याच्याजवळ आली, तिने त्याच्या खांद्यांवर हात ठेवले... आणि त्याला माथ्यापासून...

खांद्यांवरून... ते खाली पायापर्यंत एक जबरदस्त लहर दौडत गेल्यासारखे वाटले.

"तो अनुभव म्हणजे विशुद्ध प्रेम, परिपूर्णता, प्रकाश, देव... तुम्ही त्याला काय म्हणायचे ते म्हणा," तो सांगत होता. "थंडीने कुडकुडण्याचा अनुभव असतो ना, त्याच्या पन्नास हजार पट ताकदीची ती लहर होती."

मग त्या आकृतीने त्याच्या डोक्यावरचा हात मागे घेतला. ती बाजूला झाली व अदृश्य झाली. तो जागा झाला तेव्हा तो अंधारात बिछान्याच्या एका कडेला बसलेला होता.

"ते काय होतं कोण जाणे. मी त्याआधी किंवा त्यानंतर अशा प्रकारचं कल्पनाचित्र कधीही पाहिलेलं नाही," तो सांगत होता. "किंवा कदाचित ते फक्त एक स्वप्न असेल... तुम्ही ठरवा काय ते."

मॅटला त्याच जाणिवेचे पडसाद त्याच्या ब्राझिलमधील संपूर्ण वास्तवात अनुभवास येत होते. त्याला तिथल्या समुदायात सर्वत्र प्रकाश, प्रेम व स्वीकार यांचेच प्रतिध्वनी ऐकू येत होते.

तिथून व्हेरमॉन्टला परत आल्यानंतर त्याने कुठल्याही प्रकारचे उपचार घ्यायला सुरुवात केली नाही. तो चेकअपसाठी डार्टमाऊथमधल्या क्लिनिकमध्ये गेला, पण त्याची मेंदूचे स्कॅनिंग करून घेण्याची इच्छा नव्हती. जर त्या गाठीची वाढ होतच असेल – आणि त्याची जवळपास खात्रीच होती – तर त्याला ते माहीत करून घ्यायची इच्छा नव्हती. त्याला भयाचे सावट नको होते... तो शांत व स्वस्थचित्त राहण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता. अशा वेळी अनाहूतपणे टपकलेल्या आजारपणाचे व मरणाचे सतत छळणारे विचार त्याला नकोसे वाटत होते. क्लिनिकमध्ये त्याला एमआरआय करून घेण्याबाबत आग्रहाने सांगण्यात आले, पण त्याने नकार दिला. मग त्यांनी त्याचा व्रण बरा झाला आहे का, हे तपासले व त्याच्या शरीरकार्याशी संबंधित गोष्टीही (व्हायटल्स) तपासल्या. त्याची अंतिम घटिका जवळ येत चाललेली असूनही तो चांगला व्यवस्थित दिसत होता... आणि ही गोष्ट सगळ्यांनाच ठाऊक होती.

असेच काही महिने गेले. त्याला निदानाच्या वेळी जी 'अंतिम तारीख' दिली होती, तीही पार झाली. त्याला त्याचा आजार वाढत असल्याचे जाणवत नव्हते. त्याला छान वाटत होते – त्याच्या आजारासंदर्भातले भाकीत पाहता,

त्याला जितपत बरे वाटायला हवे होते त्यापेक्षा उत्तम. पण त्याला लटपटल्यासारखेही वाटत होते, एखाद्या कड्याच्या बाहेर आलेल्या पातळ सुळक्यावर उभे असल्यासारखे... कुठल्या तरी बाजूला कोसळणारच असे. पण ते कुठे... जीवनाच्या बाजूला की मृत्यूच्या?

तो शक्य तितका वेळ त्याच्या मित्रपरिवारासोबत व कुटुंबीयांसोबत घालवण्याचा प्रयत्न करत होता... त्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत होता. या गोष्टीचा उपयोग होतोय असे त्याच्या लक्षात येत होते. त्याचे मित्र त्याला शक्य तिथे मदत करत होते, 'ॲक्युपंक्चर सेन्सेशन्स'चा व 'क्रॅनिओसेक्रल थेरपी'चा खर्च करत होते. कधीकधी त्याला नकारात्मक आवाजांना दूर ठेवणे मुश्कील होत असे. त्याला आजूबाजूच्या काही लोकांकडून नकारात्मक ऊर्जा जाणवत असे – ब्राझिलमध्ये जसे समर्पित व आशावादी लोक होते, तसे इथे नव्हते. त्याच्या आईची एक मैत्रीण त्याच्या आईला सारखे सांगत होती की, त्याला पुन्हा 'किमो' घ्यायला लाव, त्याला हॉस्पिटलमध्ये जायला सांग. त्याने सर्व प्रकारचे उपचार घेऊन पाहिले होते, पण त्यातून काहीही चांगले निष्पन्न झालेले नाही, ही गोष्ट तिला समजावण्याचा सुद्धा त्याला कंटाळा आला होता. त्याची 'रेडिओसर्जरी' झाल्यानंतर डॉक्टरांनी त्याला 'आम्ही तुमच्यासाठी यापेक्षा आणखी काहीही करू शकत नाही,' असे सांगितले होते.

अखेर, त्याला काय अवस्था आहे ते पाहून येऊ या असे वाटले. मग त्याने आईला सांगितले की, मला डार्टमाऊथमध्ये एमआरआय करायला घेऊन चल.

तिथे डॉक्टरांना आश्चर्याचा धक्काच होता – त्याची गाठ आकसून कमी झाली होती. 'ग्लिओब्लॅस्टोमा मल्टिफॉर्म'च्या बाबतीत असे घडणे अशक्य मानले जात होते. मग त्यांनी मॅटला फार आशेला लावले नाही. बहुधा हा योगायोग असावा... 'फ्लूक'... तात्पुरती सुटका. आपण बरे झालो आहोत असे त्याला वाटायला लागू नये, असे त्यांना वाटत होते. 'जीएम'वर इलाज नसतो!

त्यानंतर एके दिवशी त्याच्या आईच्या मैत्रिणीच्या एका वाक्याने त्याची दिशा बदलली. त्याची दीर्घ कहाणी ऐकल्यावर तिने नकारात्मक प्रतिक्रिया दिली नाही.

''याचा उपयोग होतोय असं दिसतंय,'' ती म्हणाली. ''त्याने पुन्हा

ब्राझिलला जायला हवं.''

मॅटच्या मनात आशेचे अंकुर पुन्हा तरारले. त्याने इकडून तिकडून पैसे जमवले आणि विमानाचे तिकीट काढले.

ब्राझिलला परत गेल्यावर, तिथल्या जवळीकीच्या बंधांनी गुंफलेल्या प्रेमळ समुदायात त्याला अंघोळीला उबदार टबात उतरल्यासारखे वाटले. तिथे गेल्याबरोबर तो तिथल्या समुदायाच्या कडेवर विसावला. त्या छोट्याशा गावाच्या तालाशी त्याने ताल जुळवला. त्यानंतर एके दिवशी रात्री तो आईला ई-मेल करण्यासाठी इंटरनेट कॅफेमध्ये चालत निघालेला असताना त्याला एक तरुणी दिसली. तिचे व्यक्तिमत्त्व, ऊर्जा व थेट नजर पाहून तो जागीच थबकला. त्यांनी एकमेकांना नाव विचारले. ती तरुणी तिथे निराश अवस्थेमुळे आली होती. तिला आयुष्याचा अर्थच हरवल्यासारखे वाटत होते. तिच्या भावाचे 'लू गेरिंग्ज डिसीज'ने नुकतेच निधन झाले होते व तिच्या वडिलांचे मॅटला ज्या प्रकारचा कर्करोग होता त्याच प्रकारच्या कर्करोगाने निधन झाले होते. ते दोघे चुंबकांसारखे जवळ आले... आपण एकमेकांसाठी बनलो आहोत हे दोघांच्याही लक्षात आले.

त्या रात्री त्यांची पहिल्यांदा भेट झाली, तेव्हापासून ते एकत्रच होते. त्यानंतर मॅट व्हेरमॉन्टला परत गेलाच नाही. तो तिथेच राहून बारीकसारीक कामे करू लागला. मग त्या दोघांनी लग्न केले. त्यांनी गावात भाड्याने घर घेतले. त्याची पत्नी स्थानिक फार्मसीत काम करू लागली. आधीप्रमाणेच, मॅट सुरुवातीला 'डायग्नोस्टिक इमेजिंग' करून घेण्याचे टाळत होता. पण अखेर, त्याच्या प्राथमिक निदानानंतर दोन वर्षांनी तो एमआरआय करून घ्यायला तयार झाला. डेन्वरच्या हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी लाइट बोर्डवर टांगलेल्या इमेजपेक्षा ही इमेज खूपच वेगळी होती. त्या पहिल्या इमेजमध्ये जिथे स्वच्छ, करडा भाग असायला हवा. त्या ठिकाणी प्रचंड आकाराची पांढरी गाठ दिसत होती, पण आत्ताच्या 'इमेज'मध्ये त्या जागी आता काही दिसत नव्हते – फिल्मवर करंगळीचा ठसा उमटावा तसा इवलासा पांढरा ठिपका दिसत होता. ते काय आहे याबद्दल डॉक्टर्स खात्रीने सांगू शकत नव्हते – आकसून कमी झालेल्या गाठीचे शेवटचे अवशेष, का 'स्कार टिश्शू?' काहीही असले, तरी अशक्यप्राय गोष्ट घडली होती – त्याचा कर्करोग मागे फिरला होता. गाठ वितळून गेली होती.

मॅट अजूनही त्याच्या प्रिय पत्नीसमवेत ब्राझिलमध्येच राहतो. 'रेडिएशन थेरपी'नंतर त्याला मूलबाळ होणे अपेक्षित नव्हते. त्याच्यावर उपचार करण्याआधी डॉक्टरांनी त्याला या गोष्टीची कल्पना दिली होती. आपल्याला मुले असावीत अशी त्याची इच्छा होती, तरीही त्याने हे उपचार घेतले, कारण त्याला जगण्याची तीव्र इच्छा होती. त्याने त्या वेळी काही शुक्राणू गोठवून ठेवले होते, पण ते गोठवून जतन करण्याचा खर्च काही वर्षांनी भलताच मोठा झाला. त्यामुळे त्याला स्वत:च्या रक्ताची मुले होण्याचे स्वप्न सोडून द्यावे लागले होते.

आता त्याला दोन मुले आहेत – एक तीन वर्षांचा आहे व दुसरा पाच वर्षांचा आहे. त्याला मुले झाली – त्याची पत्नी तिच्यात नवा जीव वाढवत आहे... त्या दोघांचा अंश असणारे बाळ या जगात आणत आहे, हे तो दोनदा पाहू शकला आहे. मी त्याच्याशी फोनवर बोलत असताना – आंतरराष्ट्रीय लाइनवर अस्पष्ट आवाजात – मला लहान मुलांची धमाल दंगामस्ती ऐकू येत होती.

"इथे अवतीभोवती खूप गलका असतो," मॅट हसत म्हणाला होता.

मॅटला 'ग्लिओब्लॅस्टोमा मल्टिफॉर्म' हा मेंदूचा सर्वांत भयंकर कर्करोग असल्याचे निदान झाले होते. या गोष्टीला आता पंधरा वर्षे उलटली आहेत. त्या वेळी त्याला उपचाराविना फक्त चार महिने जगशील असे सांगण्यात आले होते, पण त्याचा हा आजार अभूतपूर्वरित्या मागे फिरला... अशा पद्धतीने, ज्याची आजच्या वैद्यकशास्त्राच्या मते पुनरावृत्ती घडवणे अशक्य आहे.

हे कसे घडले?

अर्थातच यामागे अनेक घटकांची भूमिका असू शकते, त्यापैकी बऱ्याच गोष्टींबद्दल आपण आदल्या प्रकरणांत चर्चा केली आहेच : आहारातील महत्त्वपूर्ण बदल, ताणतणाव बऱ्याच प्रमाणात कमी करणे, आयुष्याकडे व पुढील आव्हानांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे. पण सगळे चित्र कसे बदलले यासंदर्भात मॅटचा स्वत:चा सिद्धान्त असा आहे–

"मी बरा झालो ते प्रेमामुळे," तो अगदी ठामपणे सांगतो. "माझ्या दृष्टीने तेच परमेश्वर आहे, तेच जीवन आहे, बरं होणं म्हणजे तेच आहे... प्रेम."

◆

अ

भि

प्रा


य

## लक्षणीय आत्मकथन

डॉ. देविदास तारु यांचे 'आता मव्हं काय!' हे आत्मकथन मेहता पब्लिशिंग हाऊसने जून २०२३मध्ये प्रकाशित केले आहे. सावत्रपणाच्या जाचात बालपण करपून गेलेल्या एका उपेक्षित, पण प्रज्ञावंत मुलाची ही आतडी पिळवटून टाकणारी गोष्ट आहे. एकलव्याच्या निष्ठेने स्वत:ला घडविणाऱ्या एका जिद्दी मुलाची ही प्रेरणादायी गोष्ट आहे. सुरुवातीच्या आठ पृष्ठांमध्ये लेखकाने आपल्या कुटुंबाची पार्श्वभूमी सांगितली आहे. माय जमनाबाई आणि बापू कचरू यांचा हा मुलगा. नाव जरी देविदास असले, तरी सगळे 'दैदास्या' या नावानेच पुकारतात. बापू 'नांदेड टेक्स्टाईल्स मिल'मध्ये मजूर. लग्नानंतर नऊ वर्षांत पहिल्या बायकोला मूलबाळ होत नाही, म्हणून कचरूने दुसरी बायको करून आणली. गिरजाबाई तिचं नाव. हीच लेखकाची सावत्र आई. दुसरी पत्नी गिरजाबाई काळी असूनही आवडती, तर पहिली पत्नी जमनाबाई गोरी असूनही नावडती. गिरजाबाईला गंगाधर नावाचा मुलगा झाल्यानंतर दोन-तीन वर्षांनी जमनाबाईच्या पोटी 'दैदास्या' जन्मला. लेखकाने आपल्या सख्ख्या आईचे वर्णन एका वाक्यात केले आहे : 'दिसायला गोरी, पण तोंडात सुरी.'



लेखकाचा जन्म 'भीमघाट' या दलित वस्तीत झालेला. या भागात पक्की घरे नाहीत किंवा कोणत्याही भौतिक सुविधा नाहीत. केवळ झोपडपट्टी. लेखकाने या वस्तीचे फारच छान वर्णन केले आहे : 'शहराच्या एवढी जवळ, पण प्रगतीपासून कोसो दूर!'




झोपडपट्टीचे सगळे गुणधर्म या वस्तीत आहेत.

बापूची अवस्था : 'दोन बायका अन् फजिती ऐका!' अशी. शेवटी बापूने शेजारी दुसरी झोपडी बांधून त्यात लेखकाला आणि त्याच्या आईला ठेवून दिले. नायक एक वर्षाचा असताना आई त्याला अफू खाऊ घालून झोपवायची आणि बोरबन फॅक्टरीत कामाला जायची.

घरच्या दारिद्र्यामुळे दैदास्या म्हणजे एक कुपोषित बालक.

आई भाजीपाला व फळे विकण्यासाठी दिवसभर घराबाहेर असे. वडिलांचे मुलाकडे अजिबात लक्ष नसे. त्यामुळे दैदास्या खोड्या करत गावभर भटकत असे. नायकाचे शालेय शिक्षण सलग असे झालेच नाही. त्याच्या शिक्षणाचा कोणी आग्रहही धरला नाही. गोट्या खेळणे, नदीत मनसोक्त डुंबणे, मासे पकडणे, उनाडक्या करणे, भांडणे आणि मारामाऱ्या करणे, बिड्या ओढणे, दारू पिणे, मंदिरासमोरच्या चप्पल-बूट चोरून आणून विकणे, पत्त्यांच्या डावावर बसून करमणूक करणे, हॉटेलमध्ये वेटरचे काम करणे, सिनेमा पाहणे, मिरवणुकीत काठीचे जीवघेणे खेळ खेळणे, दुकानदाराचे पैसे चोरून पळून जाणे, रेल्वेतून विनातिकीट भटकणे, उगीचच कोणालाही चिडवणे किंवा शिवीगाळ करणे, समजले तर वडिलांचा हाग्यामार खाणे यातच लेखकाचे बालपण करपून गेले होते; पण उन्मार्गी वर्तनात आनंद मानणाऱ्या नायकाला या गोष्टींचा खेदही नव्हता आणि खंतही नव्हती. नायक स्वेच्छेने त्या मार्गावर गेला नव्हता, तर तो सगळा परिस्थितीचा आणि पर्यावरणाचा परिपाक होता.

लेखकाने शिवाजी विद्यालयात पाचवीला प्रवेश घेतला आणि त्याच्या आयुष्याला वळण लागले. येथील शिक्षकांनी जीव लावून नायकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. देविदासच्या अंगच्या उपजत कलागुणांचा विकास करून त्याला 'माणूस' म्हणून घडविले. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले. या सर्व गोष्टींची लेखकाने कृतज्ञतापूर्वक नोंद केली आहे. घरात वीज नसल्यामुळे लेखकाने नगरपालिकेच्या दिव्याखाली बसून अभ्यास केला. शाळाबाह्य विद्यार्थी म्हणून दहावीची परीक्षा ६३ टक्के गुणांसह उत्तीर्ण केली. दहावीनंतर

डी. एड्. करून शिक्षक बनायचे होते, पण त्याच वर्षीपासून डी. एड्. प्रवेश बारावीनंतर सुरू झाले. त्यामुळे ते स्वप्न लांबणीवर पडले.

नायकाचा प्रवास आत्मनिष्ठ जाणिवेकडून हळूहळू समाजनिष्ठ जाणिवेकडे होत गेल्याचे आपल्या लक्षात येते. कॉलेजला शिकत असताना त्याने शिष्यवृत्ती कपातीच्या कारणावरून विद्यार्थ्यांचा भव्य मोर्चा काढला. मंत्र्यांना घेराव घातला. परिणामी कॉलेजने प्रवेशच रद्द करून टाकला. पुढे समजूतदारपणे माघार घेत देविदास हीरो झाला. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे देविदासच्या व्यक्तिमत्त्वाला आणखी आकार आला. राज्यसरकारच्या पुरस्काराचा तो मानकरी ठरला. विद्यार्थी संसदेचा अध्यक्ष बनला. डी. एड्. ची संधी हुकली, तरी पदवीधर झाल्यावर  बी. एड्. करून माध्यमिक शिक्षक बनला. सामाजिक कार्यात सहभागी होत बचतगटांची स्थापना केली. यातून नायकाचे तीव्र सामाजिक भान दिसून येते.

अधिकारी बनण्यासाठी स्पर्धा परीक्षेचा ध्यास घेऊन खूप मेहनत केली. जेतवननगराच्या विकासात भरीव योगदान दिले. धडपड्या शिक्षक म्हणून शाळा नावारूपाला आणली. सेवांतर्गत एम. ए. आणि पीएच.डी. ह्या पदव्या मिळविल्या. राज्यस्तरीय प्रशिक्षक म्हणून काम केले. लेखकाच्या आयुष्याचा हा आलेख नजरेत भरण्यासारखा आहे.

या आत्मकथनाची भाषा अतिशय साधी, सोपी आणि सरळ आहे. ह्या शैलीला आलंकारिकतेचा अजिबात सोस नाही. 'आता मव्हं काय!' हे केवळ आत्मकथनाचे शीर्षक नसून एका विशिष्ट टप्प्यावर लेखकाने आत्मपरीक्षण करताना अंतर्मुख होऊन स्वत:लाच विचारलेला प्रश्न आहे. इथूनच लेखकाची मर्मदृष्टी विकसित झाली. ह्या प्रश्नाच्या उत्तरातूनच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत गेला आहे. आत्मकथनाच्या सुरुवातीच्या निम्म्या भागात लेखकाने स्वत:ला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून स्वत:च स्वत:ची उलटतपासणी केली आहे. हे करताना त्यांनी स्वत:ची वकिली मात्र केली नाही. आत्मकथनाच्या उत्तरार्धातील नायकाच्या विकासाचे विविध टप्पे स्तिमित करतात. 'हाच का तो प्रवाहपतित झालेला दैदास्या?' असा प्रश्न वाचकाला पडतो. दैदास्याच्या अवस्थांतराची ही हकिगत मोठी रोमांचकारी आहे. हे सगळे आंतरिक प्रेरणेने घडले, हे विशेष!

लेखकाने आत्मकथनाची मांडणी छोट्या छोट्या ६५ प्रकरणांमधून केली

आहे. प्रकरणांची शीर्षकेही प्रासयुक्त आणि उत्कंठावर्धक आहेत. लेखकाने सावत्रपणाचे चटके सोसले असले, तरी कोणावरही आगपाखड केली नाही. बापू, सख्खी आई, सावत्र आई अशा सगळ्यांनाच समजून घेतले आहे. यातून लेखकाचे समंजस आणि समजूतदार व्यक्तिमत्त्व अभिव्यक्त झाले आहे. लेखकाने शहरी अधोविश्वाची ओळख अतिशय प्रत्ययकारी पद्धतीने करून दिली आहे. दारिद्र्याचे दशावतार प्रच्छन्नपणे मांडले आहेत. दारिद्र्यातील दिलदारपणाचे किस्से वाचकमनाला हलवून जातात. मानवी स्वभावाचे कंगोरे अतिशय बारकाईने टिपले आहेत. लेखकाने आयुष्याच्या प्रत्येक वळणावर भेटलेल्या सुहृदांविषयी पानोपानी कृतज्ञता व्यक्त केली आहे. आपल्या फसलेल्या पहिल्या प्रेमप्रकरणाची प्रांजळ कबुली दिली आहे. शिक्षण संस्थेतील आर्थिक शोषणावर एक कटाक्ष टाकला आहे. शिक्षणाधिकारी कार्यालयाची चिरफाड केली आहे. उपेक्षित लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडविले आहे. हे जसे एका लेखकाचे आत्मकथन आहे, तसेच हे एका झोपडपट्टीचे आणि तेथील दुर्लक्षित जनजीवनाचे स्वकथन आहे.

स्वत:च्या लग्नातील मानपानाचा आणि नातेवाइकांच्या वर्तनाचा प्रसंग लेखकाने तटस्थपणे सांगितला आहे. नायकाची झालेली वंचना आणि उपेक्षा पाहिल्यावर हा खडकावरचा अंकुर आहे, अशीच प्रतिमा वाचकमनात निर्माण होते. नायकाची सामाजिक परिवर्तनाविषयीची तळमळ दिसून येते. शिक्षणाची आणि एकएक गड सर करण्याची नायकाची जिद्द पाहिल्यावर या नायकाने महात्मा गौतम बुद्धांचा 'अत्त दीप भव' हा संदेश आपल्या आयुष्यात तंतोतंत उतरविला आहे, हे आपल्या लक्षात येते. नायकाची संवेदनशीलता आणि सर्जनशीलता अनेक प्रसंगांतून प्रतिबिंबित झाली आहे.

शिक्षणाचा ध्यास घेतला, तर माणसाच्या जीवनात क्रांती होऊ शकते, हा मुद्दा लेखकाने ह्या आत्मकथनात अतिशय जोरकसपणे अधोरेखित केला आहे. लेखकाने स्वत:सह, गणगोतापैकी कोणाच्याही चुकांवर पांघरूण घातले नाही. लेखकाने कुठेही स्वत:चे समर्थन केले नाही. प्रयत्नपूर्वक वाल्याचा वाल्मीकी होऊ शकतो, हे लेखकाने दाखवून दिले आहे. आयुष्याचा पूर्वार्ध कितीही काळाकुट्ट असला, तरी उत्तरार्ध उज्ज्वल करता येतो, हे लेखकाने सिद्ध केले आहे. हे अतिशय प्रांजळ आणि म्हणूनच प्रेरणादायी आत्मकथन आहे.

**– डॉ. सुरेश सावंत, नांदेड**

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# सूत्रे नेतृत्व विकासाची

**एमा डी व्हिटा**

अनुवाद

**प्रमोद शेजवलकर**




नेतृत्व आणि व्यवस्थापन कौशल्याची गुरुकिल्ली

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**




**अतुल कहाते**




विदेशी शेअर दलालांच्या रोचक कहाण्यांतून शेअर बाजाराचा घेतलेला सर्वांगीण वेध

**किंमत : ७५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## १६ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत**

**१६ऑक्टोबर - ऑस्कर वाईल्ड यांचा जन्मदिन**

‘द पिक्चर ऑफ डोरियन ग्रे’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**२०ऑक्टोबर - चेतन जोशी यांचा जन्मदिन**

‘कॉकटेल कार्निवल’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २९९/-**

---

**२१ऑक्टोबर - सर आल्फ्रेड नोबेल यांचा जन्मदिन**

‘नोबेल ललना भाग १’, ‘नोबेल ललना भाग २’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ३१५/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२१ ऑक्टोबर - पॉल विल्सन यांचा जन्मदिन**

‘शांततेनं काम करा!’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२३ ऑक्टोबर - मायकेल क्रायटन यांचा जन्मदिन**

‘नेक्स्ट’, ‘पायरेट लॅटिट्यूड्स’, ‘प्रे (सावज)’, ‘स्टेट ऑफ फिअर’ ‘मायक्रो’, ‘डिस्क्लोजर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २३३०/- । सवलत किंमत १४१७/-**

---

**२३ ऑक्टोबर - अरविंद अडिगा यांचा जन्मदिन**

‘द व्हाइट टायगर’, ‘ॲम्नेस्टी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६४५/- । सवलत किंमत ४३२/-**

**२४ ऑक्टोबर - रोशन दलाल यांचा जन्मदिन**

'सत्तरीतला भारत' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२४ ऑक्टोबर - आर. के लक्ष्मण यांचा जन्मदिन**

'कसं बोलतात!' भाग १ ते ७ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६६५/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**२६ ऑक्टोबर - हिलरी क्लिंटन यांचा जन्मदिन**

'लिव्हिंग हिस्ट्री', 'हिलरी क्लिंटन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७६५/- । सवलत किंमत ५१९/-**

---

**२७ ऑक्टोबर - ॲरन राल्स्टन यांचा जन्मदिन**

'ते १२७ तास!' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२९ ऑक्टोबर- ली चाइल्ड यांचा जन्मदिन**

'नथिंग टू लूज', 'वन शॉट', 'नेव्हर गो बॅक' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १२४०/- । सवलत किंमत ७४४/-**

---

**३० ऑक्टोबर-डेव्हिड बेनब्रिज यांचा जन्मदिन**

'टीनएजर्स' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**खालील संचांवर १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान खास सवलत**

**२ नोव्हेंबर - जयश्री कुलकर्णी यांचा जन्मदिन**

'मांजराची सावली', 'विषवल्ली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**

**२ नोव्हेंबर - कविता भालेराव यांचा जन्मदिन**

'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग १', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२ नोव्हेंबर - अरुण शौरी यांचा जन्मदिन**

'गव्हर्नन्स', 'द पार्लमेन्टरी सिस्टिम', 'हे सर्व आपल्याला कोठे नेणार?', 'कळेल का 'त्याला' आईचं मन?', 'मागील पानावरून... मागेच'!, 'आत्मवंचना', 'वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण वाचवेल का?', 'ख्यातनाम इतिहासकार', 'अनिताला जामीन मिळतो' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७५०/- । सवलत किंमत २८३९/-**

---

**२ नोव्हेंबर - ल्यूसी हॉकिंग यांचा जन्मदिन**

'जॉर्ज अॅन्ड द बिग बॅंग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द यूनिव्हर्स', 'जॉर्ज अॅन्ड द ब्लू मून', 'जॉर्ज अॅन्ड द शिप ऑफ टाइम', 'जॉर्ज अॅन्ड द अनब्रेकेबल कोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६७०/- । सवलत किंमत १७९०/-**

---

**३ नोव्हेंबर - लीला गोविलकर यांचा जन्मदिन**

'मराठीचे व्याकरण' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २९९/-**

---

**३ नोव्हेंबर - रिचर्ड होम्स यांचा जन्मदिन**

'चर्चिलच्या पाऊलखुणा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**५ नोव्हेंबर - डॉ. अतुल गवांदे यांचा जन्मदिन**

'बीइंग मॉर्टल', 'बेटर', 'जीव जिथे गुंतलेला...', 'यशप्राप्तीचा जाहीरनामा!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०९०/- । सवलत किंमत ८१९/-**

**६ नोव्हेंबर - श्याम भुर्के यांचा जन्मदिन**

‘आनंदाचं पासबुक’, ‘गोष्टीचं एटीएम’, ‘खुमासदार अत्रे’, ‘मंत्र श्रीमंतीचा’, ‘पु.ल. : एक आनंदयात्रा’, ‘पुणं एक साठवण’, ‘सभेत कसे बोलावे’ ‘द माइंड जिम’, ‘द स्टार प्रिन्सिपल’, ‘द माइंड जिम रिलेशनशिप्स’, ‘मार्ग आत्मविश्वासाचा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२५०/- । सवलत किंमत १६८४/-**

**६ नोव्हेंबर-डॉ. संजय ढोले यांचा जन्मदिन**

‘अंतराळातील मृत्यू’, ‘अश्मजीव’, ‘डिंभक’, ‘प्रेमाचा रेणू’, ‘संकरित’, ‘प्लँटोन’, ‘खुजाबा’, ‘राफिणू’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१७०/- । सवलत किंमत १३०२/-**

**७ नोव्हेंबर-रत्नावली दातार यांचा जन्मदिन**

‘सुखद बालसंगोपन’, ‘सुखद मातृत्व’, ‘सुखद वृद्धत्व’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ३५५/- । सवलत किंमत २१३/-**

**७ नोव्हेंबर - हेलन गार्नर यांचा जन्मदिन**

‘एक विश्रांती स्थळ’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**७ नोव्हेंबर-जागतिक कर्करोग जागरूकता दिन**

‘कॅन्सर रोखू या एका सजग जीवनशैलीसह’, ‘इट्स नॉट अबाउट द बाइक’, ‘द जॉय ऑफ कॅन्सर’, ‘आयुष्याचा अंतिम संस्कार’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५६९/-**

**११ नोव्हेंबर - सुरेखा शहा यांचा जन्मदिन**

‘थेंबभर पाणी अनंत आकाश’, ‘जोहड’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६३०/- । सवलत किंमत ४१०/-**

**१२ नोव्हेंबर-ख्रिस्तोफर रिच यांचा जन्मदिन**

'रुल्स ऑफ डिसेप्शन्स' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ४८०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१३ नोव्हेंबर-ना. रा. वडनप यांचा जन्मदिन**

'बुद्धिबळाचा ओनामा', 'सुसंघटित मारा', 'चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे,' 'बुद्धिबळाचा श्रीगणेशा', 'बुद्धिबळ शिका' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ५४९/-**

---

**१४ नोव्हेंबर-बालदिन**

**संच १ -** चित्रमय रंगतदार कथा भाग १ ते १४ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २९६०/- । सवलत किंमत १४८०/-**

**संच २ -** ससोबा हसोबा मालिका भाग २, दोस्ती, खुलदाबादचा खजिना, जंगल जंमत मालिका भाग १ व २, चित्रमय बोधकथा भाग १, एल्मर मालिका, कांगारू देशीच्या गोष्टी, जादूमंतर छू, मर्कटराजा, हनुमान, शिकारी बनला शिकार, समादचा वाळवंटातील व रानातील फेरफटका, जादूचं रबर आणि इतर गोष्टी, गोष्टी देशोदेशीच्या या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २९४०/- सवलत किंमत १४७०/-**

**संच ३ –** ससोबा हसोबा मालिका भाग १, ग्रेटाची गोष्ट, मोठ्यांच्या छोट्या गोष्टी, पंचतंत्रातील गोष्टी (५ पुस्तकांचा संच), जातक कथा, हितोपदेश, निसर्ग आणि इतर गोष्टी, गोष्ट डॉट कॉम १,२,३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २३३५/- सवलत किंमत ११६८/-**

**संच ४ -** फ्रँकलिन मालिका भाग १ ते ९, बब्बड भाग १, गम्मत कोडी या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किमत २०५५/- सवलत किंमत १०२८/-**

**संच ५ –** आपली सृष्टी संच, शेवडे गुरुजी संच या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किमत ३१८०/- । सवलत किंमत १५९०/-**

**संच ६ -** विक्रम वेताळ मालिका भाग १ ते ३, अकबर बिरबल मालिका (अजब आज्ञापालन), अकबर बिरबल मालिका (बोलकी थैली), विज्ञान नवलाई संच या

पुस्तकांच्या संचांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किमत १९३० /-  सवलत किमत ९६५/-**

**संच ७ -** विल्यम शेक्सपिअर संच, अस्थी, घरटे, सूर्यास्त, मध्यरात्र, यज्ञकुंड, सैनिकहो तुमच्यासाठी...

या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १९०० /- । सवलत किंमत ९५०/-**

---

**१४ नोव्हेंबर - जागतिक मधुमेह दिन**

'चला जाणून घेऊ या! मधुमेह', 'मधुमेह एक आव्हान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**१४ नोव्हेंबर-जोसेफ तुस्कानो यांचा जन्मदिन**

'ग्रेटाची गोष्ट', 'सत्तरीतला भारत' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५२०/- । सवलत किंमत ३५९/-**

---

**१५ नोव्हेंबर-संजय राऊत यांचा जन्मदिन**

'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५९९/-**

◆




# कास्ट मॅटर्स

**या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने आमच्या ग्रंथदालनात वाचकांनी घेतली लेखक डॉ. सुरज एंगडे यांच्याशी थेट भेट!**







## ऑशविट्झच्या लहानग्या पोरी | ऑशविट्झचा फोटोवाला

**हिटलरने केलेल्या ज्यू लोकांच्या अमानुष छळाचे चित्रण असणाऱ्या आत्मकथांचे प्रकाशन**




'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/10/2023 Posting Date : 11/10/2023

## आवर्जून वाचावे...



























**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,